नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

मार्च
९४८

किंमत
८ आणे

संपादक :
वा. ना देशपांडे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता—
वामन नारायण देशपांडे
संपादक ‘ युगवाणी ’
टिळकवाडी, यवतमाळ (वऱ्हाड).

युगवाणी

व्यावसायिक पत्रव्यवहाराचा पत्ता—
द. ना. ठाकूर,
महेश्वर प्रेस, मुधोळकर पेठ,
अमरावती (वऱ्हाड).

★ मार्च अंक ★

अनुक्रमणिका

* * *

१	मुखीं पुन्हा तांबूल (कविता) — बी. रघुनाथ	७७
२	भवभूतींचें पद्मपुर — प्राचार्य वा. वि. मिराशी, एम्. ए.	७८
३	नवीन समीक्षेचीं मूलतत्त्वें — शरच्चंद्र मुक्तिबोध, एम्. ए.	८३
४	Bee यांची अखेर — खं. गो. प्रधान	९७
५	जीवन लहरी (कविता) — मनोहर शिरवाडकर	१०१
६	हृदयाची साक्ष — द. चिं. सोमण	१०२
७	ती पहिली गांठ (कविता) — अनंत आठले, बी. ए.	१०८
८	मराठी नाट्यांतील विनोद विकास — मो. द. ब्रह्मे, एम्. ए., एल् एल्. बी	१०९
९	संपादकीय	११६



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

मुखीं पुन्हा तांबूल!

कशाला मुखीं पुन्हा तांबूल ?
गुलाब शोधित झुरुनि मले काट्यावर बुलबूल !

पदर सरळ तरि भांग वाकडा,
चार—जणींचा तसा न मुखडा,
खडा न टाकिल कोण चोरटी बघुनि हूल चाहूल !

सरळ सोवळ्या शुकसनकांना
पापणिचा पडतांच उखाणा
उकलितांच होतील गुंतुनी ते आकुल व्याकूल !

खळीजवळ लसलसें गोंदलें,
विषार मादक पिउनि तेथलें—
मदनाचें का जळतां काळिज उरलें निळें डहूळ ?

कुठुनि निघाली कुठे संपली
मुरड एक अशि क्षणैक स्फुरली,
सभा पडे घायाळ भुईवर भरुनि मधुर उरिं शूल !

आग अग्निपुटिं चुना जाहला
पानासह त्वां 'लाल'स केला,
विषें विविध पचवूनहि शोभसि मोहक हसरें फूल !

बी. रघुनाथ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
मकर संक्रांत, १९२३

भवभूतीचें पद्मपुर

प्राचार्य वा. वि. मिराशी, एम्. ए.

● विदर्भ-साहित्य-संघाच्या गोंदिया येथील अधिवेशनाच्या निमित्ताने गोंदियाजवळ असलेल्या महाकवि भवभूतीच्या पद्मपुराचा परिचय या लेखांत विद्वद्वर्य प्राचार्य मिराशी यांनी करून दिला आहे, तो वाचकांस उद्बोधक वाटेल.

पद्मपुराचा शोध लावण्याचें सर्व श्रेय प्राचार्य मिराशी यांजकडेच जातें. त्यांनी सुचविल्याप्रमाणें पद्मपुरास भवभूतीचें स्मारक होणें अत्यवश्य आहे.

*

पुरा यत्र स्रोतः पुलिनमधुना तत्र सरिताम्
विपर्यासं यातो घनविरलभावः क्षितिरुहाम्
बहोर्दृष्टं कालादपरामिव मन्ये वनमिदं
निवेशः शैलानां तदिदमिति बुद्धिं द्रढयति ॥

उत्तररामचरित, २, २७

संस्कृत ग्रंथकार आपल्या ग्रंथांमध्ये स्वतःविषयीं सामान्यतः मुग्धता स्वीकारतात, त्यामुळें त्यांच्या स्थलकालाविषयीं माहिती अनुमानाने जमवावी लागते. सुप्रसिद्ध संस्कृत नाटककार भवभुति हा या बाबतींत कांही अंशीं अपवाद आहे. त्याने आपल्या

अर्थ— ‘ पूर्वी जेथे नद्यांचीं पात्रें होतीं, तेथे आता वाळवंटें झालीं आहेत. झाडी दाट होती, तेथे विरळ झाली आहे व विरळ होती, तेथे दाट झाली आहे. पुष्कळ काळाने हें अरण्य दृष्टीस पडल्यामुळे तें जणूं काय, अगदीच निराळें असें दिसत आहे. पर्वताच्या स्थानावरून मात्र तेंच हें स्थान अशी ओळख मनाला पटत आहे. ’ दण्डकारण्याचें हें वर्णन रामचंद्रांनी चौदा वर्षांनी भेट दिल्यावर केलें आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कालाविषयीं किंवा स्वतःच्या आश्रयदात्याविषयीं आपल्या ग्रंथांत कांही उल्लेख केला नाही. तथापि त्याचा समकालीन प्राकृत कवि वाक्पतिराज व काश्मीरचा प्रख्यात इतिहासकार बिल्हण यांनी दिलेल्या माहितीवरून तो कनोजचा सम्राट् यशोवर्मा याच्या काळीं इ. स. च्या आठव्या शतकाच्या पूर्वार्धांत होऊन गेला, या विषयीं संशय नाही. आपलें जन्मस्थान, कुल व विद्वत्ता या विषयीं मात्र भवभूतीने स्वतःच्या ग्रंथांत बरीच माहिती दिली आहे. उदाहरणार्थ महावीरचरिताच्या प्रस्तावनेंत सूत्रधार नाटककर्त्याविषयीं खालील माहिती देतो, ती पहा. 'अस्ति दक्षिणापथे पद्मपुरं नाम नगरम्। तत्र केचित्तैत्तिरीयिणः काश्यपाश्चरणगुरवः पंक्तिपावनाः पञ्चाग्नयो धृतव्रताः सोमपीथिन उदुम्बरनामानो ब्रह्मवादिनः प्रतिवसन्ति। तदामुष्यायणस्य तत्रभवतो वाजपेययोजिनो महाकवेः पञ्चमः सुगृहीतनाम्नो भट्टगोपालस्य पौत्रः पवित्रकीर्तेर्नीलकण्ठस्यात्मसंभवः श्रीकण्ठपदलाञ्छनो भवभूतिर्नाम जातूकर्णीपुत्रः कविर्मित्रधेयमस्माकमित्यत्रभवन्तो विदाङ्कुर्वन्तु।—' यावरून भवभूतीच्या पूर्वजांचें कुलनाम उदुंबर असून ते कृष्णयजुर्वेदी तैत्तिरीय शाखेचे, काश्यपगोत्री, पंचाग्नि ठेवणारे, सोमयाग करणारे ब्रह्मवेत्ते असे विद्वान् व पुण्यशील ब्राह्मण होते, त्यांच्यापैकीं महाकवि नामक भवभूतीच्या पाचव्या पूर्वजाने वाजपेय नामक महायज्ञ केला होता व ते ब्राह्मण दक्षिणापथांत पद्मपुर येथे राहत असत, अशी महत्त्वाची माहिती आपणांस मिळते. नर्मदेच्या दक्षिणेस असलेल्या प्रदेशास दक्षिणापथ असें म्हणत व या प्रदेशाचा या नांवाने उल्लेख कोरीव लेखांत अनेकदा येतो. भवभूतीच्या दुसऱ्या 'मालती माधव' नामक नाटकांत तर 'अस्ति दक्षिणापथे विदर्भेषु पद्मपुरं नाम नगरम्' असें स्पष्ट विधान आहे. त्यावरून भवभूतींच्या पूर्वजांचें निवासस्थान पद्मपुर हें विदर्भांतच होतें, याविषयीं संशय राहत नाही.

हें पद्मपुर कोणतें, याविषयीं विद्वानांना निश्चित माहिती नव्हती व कोणी तें ठरविण्याचा विशेष प्रयत्नहि केला नव्हता. सुमारें तेरा वर्षांपूर्वी वाकाटकांच्या एका अपूर्ण ताम्रपटाचा छाप कै. रायबहादूर डॉ. हिरालाल यांनी मजकडे पाठविला. त्यांत तो ताम्रपट पद्मपुराहून दिला होता, असें म्हटलें होतें. त्यामुळें माझें या प्रश्नाकडे लक्ष गेलें व मी प्राचीन पद्मपुराचा शोध करूं लागलों. मध्यप्रांतांत पद्मपुर किंवा पद्मापुर या नांवाचीं पाच सहा गांवें भिन्नभिन्न जिल्ह्यांतील गांवांच्या यादींत सांपडलीं. त्याविषयीं चौकशी केली, पण त्यांपैकीं कोठेंहि प्राचीन अवशेष आहेत, अशी माहिती मिळाली नाही. भंडारा जिल्ह्यांतील आमगांव स्टेशनजवळच्या पद्मपुराजवळ मात्र असे अवशेष आहेत, अशी माहिती मिळाल्यामुळे १९३४ च्या नाताळांत माझे स्नेही श्री. ल. रा. कुळकर्णी व श्री. ना. पु. पाठक यांच्यासह त्या ठिकाणीं जाऊन आमगांवचे श्री. जोशी यांच्या साहाय्याने त्याठिकाणाची पाहणी केली व हें पद्मपुरच भवभूतींचें जन्मस्थान अशी विविध प्रमाणांवरून खात्री पटल्यावर 'इंडियन् हिस्टॉरिकल क्वार्टर्ली' (पुस्तक ११, पृ. २८७-२९९) या सुप्रसिद्ध संशोधनपर इंग्रजी त्रैमासिकांत व 'सह्याद्रि' (पु. १, पृ. ३७७-३८६) या मराठी मासिकांत तेथील अवशेषांच्या छायाचित्रांसहित लेख प्रसिद्ध केले. वर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उल्लेखिलेल्या वाकाटकांच्या अपूर्ण ताम्रपटाविषयींहि श्री. बी. ए. बंबावाले, त्या-वेळचे दुर्गाचे डेप्युटी कमिश्नर, यांच्या साहाय्याने तपास करून तो मिळाल्यावर 'एपिग्राफिया इंडिका' पु.२२, पृ.२०७-२१२ मध्ये प्रसिद्ध केला. तो ताम्रपट सध्या म्यूझियममध्यें ठेवला आहे. गेल्या बारा वर्षांत या पद्मपुरच्या स्थलनिर्णयाबद्दल कोणी संशय प्रकट केला नाही. उलट गतवर्षी कलकत्ता विश्वविद्यालयांतील अध्यापक व प्रसिद्ध संशोधक डॉ. दिनेशचंद्र सरकार यांनी हा स्थलनिश्चय योग्य असल्याचें इं. हि. क्वा. (पु. २२ पृ. २३३) मधील आपल्या लेखांत कबूल केलें. तेव्हा हा स्थळनिश्चय पक्का झाला, असें म्हणण्यास हरकत नाही. या वर्षी या पद्मपुराजवळच गोंदिया येथें विदर्भसाहित्य संमेलन भरत आहे. त्या प्रसंगीं प्रथितयश भवभूति कवीचें पद्मपुरास कांही स्मारक करावें, कशी संमेलनाच्या चालकांची इच्छा आहे. या निमित्ताने पद्मपुराविषयीं थोडी माहिती देत आहे.

भवभूति पद्मपुराचा उल्लेख 'नगर' म्हणून करतो. कामसूत्राचा टीकाकार यशोधर हा 'नगरं अष्टशतग्राममध्ये तद्व्यवहार–स्थानम्' (आठशे गांवांचा व्यवहार जेथे चालतो, तें नगर) अशी नगराची व्याख्या करतो. त्यावरून पद्मपुर हें बरेंच भरभराटींत असलेलें शहर असावें. वाकाटकांच्या वर उल्लेखिलेल्या ताम्र-पटावरून पद्मपुर हें तत्कालीं त्यांचें राजधानीचें ठिकाण होतें, असें दिसतें. वाकाटक वंशाच्या दोन मुख्य शाखा होत्या, त्यांपैकी वडील शाखेच्या अमलाखालीं उत्तर विदर्भ असून तिची राजधानी प्रथम रामटेक जवळचें नन्दिवर्धन व नंतर वर्धा जिल्ह्यांतील प्रवरपुर (पवनार) हें होतें. दुसऱ्या शाखेची राजधानी वत्सगुल्म (सध्याचें वाशीम) येथे होती व तिच्या अमलाखाली दक्षिण विदर्भ व निजामच्या राज्याचा उत्तर भाग होता. इ. स. ४५० च्या सुमारास बस्तर संस्थान व त्याजवळच्या भागावर राज्य करणाऱ्या नळवंशी भवदत्तवर्मा नामक राजाने विदर्भावर स्वारी करून उत्तर विदर्भाचा बराचसा भाग आपल्या सत्तेखालीं आणला व खुद्द नान्दिवर्धन येथे आपली राजधानी केली. त्यावेळीं वाकाटकांच्या वडील शाखेला आपली राजधानी प्रवरपुराहून हलविणें भाग पडलें असावे. तत्कालीन वाकाटक नृपति नरेन्द्रसेन याच्या मांडलिकांमध्ये कोसल (छत्तीसगड), मेकल (नर्मदा नदीच्या उगमाजवळचा प्रदेश) व मालव (माळवा) या देशांच्या राजांचा प्रामुख्याने उल्लेख आहे. तेव्हा नरेन्द्रसेनाने स्वतःच्या आपत्कालीं आपल्या राजनिष्ठ मांडलिकाच्या कोसल देशाजवळ प्रस्तुत पद्मपुरास आपली राजधानी नेली असली, तर त्यांत आश्चर्य नाही. पद्मपुरा-जवळचा प्रदेश वाकाटकांच्या राज्यांत मोडत होता, यांत संशय नाही. नरेन्द्रसेनाचा पिता द्वितीय प्रवरसेन याच्या शिवनी येथील ताम्रपटांत उल्लेखिलेलीं करंजाविरक, ब्रह्मपूरक व कोल्लपूरक हीं गांवें पद्मपुरापासून थोड्या अंतरावर कारंजा, बाम्हनी व कुल्पा या नांवाने अद्यापि विद्यमान आहेत. हीं गांवें बेण्णाकार्पर भागांत होतीं, असें त्या ताम्रपटांत म्हटलें आहे. हा प्रदेश वेणा किंवा वाइनगंगा नदीच्या तीरा-वरचा असून सामान्यतः सध्याच्या भंडारा जिल्ह्याशी समकक्ष असावा.

पद्मपुर येथे वाकाटकांची राजधानी किती काळ होती, तें समजत नाही. नरेन्द्रसेनाचा पुत्र द्वितीय पृथ्वीषेण याने नळवंशीयांस उत्तर विदर्भातून हाकून लावलें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पण त्याने पद्मपुराहून आपली राजधानी हलविली किंवा तेथेच राज्य केलें, हें सांगतां येत नाही. या पृथ्वीपेणानंतर लौकरच या वडील शाखेचा अस्त झाल्याने पद्मपुरास उतरती कळा लागली असावी.

आमगांवजवळच्या पद्मपुरास त्याच्या प्राचीन वैभवाचीं कांही स्मारकें अद्यापि अवशिष्ट आहेत. गांवाला लागूनच एक टेकडी आहे. तिला नाथमहाराजांची टेकडी म्हणतात. तेथून गांवाचें मनोहर दृश्य दिसतें. या टेकडीवर दोन प्राचीन मूर्ति असलेल्या शिळा अद्यापि विद्यमान आहेत. दोन्ही शिळांवर एक चतुर्भुज देव व द्विभुज देवी यांच्या आकृती कोरल्या आहेत. देवाच्या वरच्या दोन्ही हातांत शूळासारखें आयुध असून खालच्या उजव्या हातांत कलश व डाव्या हातांत गदा आहे. देवीच्या डोकीवर छत्र असून वर केलेल्या उजव्या हातांत कलश आहे व डावा हात खाली सोडला आहे.

याशिवाय गांवाच्या जवळच एका सुमारें १८ फूट उंच असलेल्या खडकावरील एका शिलेवर चतुर्भुज विष्णूची मूर्ति कोरली आहे. विष्णूची मूर्ति सम्मुख असून त्याच्या हातांत शंख, चक्र, गदा व पद्म हीं दाखविलीं आहेत. मूर्तीच्या दोन्ही बाजूंस खांब व त्यांवर कमान दाखविली असून तिच्या उजव्या बाजूस सेवक व डाव्या बाजूस सेविका यांच्या मूर्ति कोरल्या आहेत. ही मूर्ति मध्ययुगीन कालांतील आहे.

याखेरीज गांवाजवळच्या शेतांत जैन तीर्थंकरांच्या काही छिन्नविच्छिन्न झालेल्या मूर्तींचे अवशेष आम्हांस आढळले. त्यांपैकी एक पार्श्वनाथाची व दुसरी ऋषभदेवाची होती. याहि मूर्ति मध्ययुगीन दिसतात. शिवाय पद्मपुर गांवाजवळच दोन मोठ्या देवळांचे अवशेष आढळतात. यांपैकी एक देऊळ गांवाच्या उत्तरेस सुमारें २०० यार्डांवर असावें. या देवळाच्या अवशेषांत दरवाजाच्या चौकटीची गणेशपट्टी ८ फूट लांब, १ फूट ७ इंच रुंद व १ फूट ६ इंच जाड आहे त्यावरून त्या दरवाजाच्या रुंदीची कल्पना येईल. बाकीचे अवशेषहि असेच भव्य आकाराचे आहेत. गणेशपट्टीवरील गणपतीच्या मूर्तिवरून हें देवालय शिवाचें होतें असें वाटतें. दुसरें देऊळहि गांवाला लागूनच होतें. त्याचे काही दगडी खांब व देवाच्या मूर्तिमागची प्रभावळ अद्यापि उभी आहे. बाकीचे कांही खांब मातींत दबले आहेत. प्रभावळीच्या आकारावरून तिच्या पुढील मूर्ति सुमारें पाच फूट आकाराची असावी. सुमारें ५० वर्षांपूर्वी तेथून एक मूर्ति एका साहेबाने नागपूरच्या म्यूझियममध्ये नेली होती, असें तेथील वृद्ध माणसे सांगतात. नागपूरच्या म्यूझियममध्ये ५८ इंच उंचीची व उत्कृष्ट रीतीने कोरलेली शिवाची उभी मूर्ति दृष्टीस पडते, ती भंडाऱ्याहून आणली होती, असा तिजजवळ ठेवलेल्या फलकावर निर्देश आहे. या मूर्तीची उंची, रुंदी व आकृति हीं पद्मपुरच्या प्रभावळीला जमेशीं आहेत. त्यावरून ही मूर्ति खुद्द भंडाऱ्यास सांपडली नसून भंडारा जिल्ह्यांतील पद्मपुरास सांपडली असावी, असा तर्क केल्यास तो बहुधा चूक होणार नाही. या मूर्तीचें छायाचित्र कव्हर पेजवर दिलें आहे, त्यावरून तिच्या सौंदर्याची कल्पना येईल.

या मूर्तीची पादपीठासहित उंची ४ फूट १० इंच असून ती सैकतप्रस्तरा-(Sandstone) ची बनविलेली आहे. तिचें शिल्पकाम अत्युत्कृष्ट असून प्राचीन

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पद्धतीचें आहे. मूर्तीच्या डोक्यावरची कमान सर्पांची केली असून मध्ये कीर्तिमुख आहे. भगवान् शंकराच्या शिरावर जटामुकुट आहे. कीर्तिमुखाकार रत्न व त्यावर चंद्रकला समोरच दिसते. त्याच्या गळ्यांत अनेक अलंकार दाखविले आहेत. गळ्यांत घातलेली पुष्पमाला जवळ जवळ घोट्यापर्यंत खालीं लोंबत असलेली दिसते. त्याच्या उजवीकडल्या वरच्या हातांत त्रिशूल व खालच्या हातांत रुद्राक्षमाळ आहे. डावीकडच्या वरच्या हातांत फणा पसरलेला सर्प व खालच्या हातांत कलश दिसतो. खालच्या उजव्या व डाव्या हाताजवळ अनुक्रमें मोरावर बसलेला कार्त्तिकेय व गणेश दाखविले आहेत. त्यांच्या पायांजवळ उजव्या बाजूस त्रिशूलधारी व डाव्याबाजूस कपालमुख दंड धारण करणारा सेवक कोरला आहे. त्यांच्या पलीकडे दोन्ही बाजूस चवरी घेऊन एक एक सेविका उभी आहे. पादपीठावर एका बाजूस बसलेल्या स्त्रीची आकृति व तिच्या समोरच नंदी कोरला आहे.

पद्मपुर भरभराटींत होतें, त्या काळाला आज सुमारें दीड हजार वर्षे झालीं. या प्रदीर्घ काळांत त्या प्राचीन नगराचें एका लहानशा खेड्यांत रूपांतर झालें आहे. एके काळीं सुसमृद्ध साम्राज्याची राजधानी असलेल्या या नगराचे आजचे दृश्य भवभूतीच्या दृष्टीस पडल्यास अनेक वर्षांनीं दण्डकारण्याला भेट देणाऱ्या रामाप्रमाणेंच त्याच्या तोंडूनहि या लेखाच्या आरंभीं दिलेल्या श्लोकांतल्या प्रमाणें उद्गार निघतील यांत संशय नाहीं. भवभूतीने पद्मपुराचें सविस्तर वर्णन कोठेंहि दिलें नसल्यानें आपणांस इतर प्रमाणांवरून व राहिलेल्या अवशेषांवरून त्याच्या जन्मस्थानाचा निर्णय केला पाहिजे. प्रस्तुत लेखांत मांडलेल्या पुराव्यावरून आमगांवाजवळचें पद्मपुर हेंच त्या प्राचीन विदर्भाला ललामभूत झालेल्या संस्कृत कवीचें जन्मस्थान होय, या विषयीं वाचकांची खात्री होईल, अशी आशा आहे. या ठिकाणीं त्या कवीच्या कीर्तीला साजेसें स्मारक करणें हें या प्रांताच्या सरकारचें व सुसंस्कृत जनतेचें कर्तव्य आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नवीन समीक्षेचीं मूलतत्त्वें

शरच्चंद्र मुक्तिबोध, एम्. ए.

● मूळचे मध्यभारतांतील, पण हल्ली जबलपुरास राहणारे रा. मुक्तिबोध हे ' नव्या दमा 'चे तरुण साहित्यिक आहेत. त्यांच्या या लेखांत टीकाशास्त्राच्या अभ्यासकांस पुष्कळ विचारणीय भाग आढळेल. म्हणूनच हा लेख कांहीसा मोठा असतांहि तो या अंकीं संपूर्ण दिला आहे.

* *

– १ –

साधारण माणसाप्रमाणेच कलावंताची जाणीव आणि त्याचे विचार यांच्यावर तत्कालीन सामाजिक परिस्थितीचें प्रतिबिंब पडत असतें. परंतु तें प्रतिबिंब स्तब्ध जलाशयांत एकाद्या झाडाचें जसेंच्या तसें पडणारें प्रतिबिंब नसतें; तर कलावंताच्या मनाच्या आनुवंशिक वृत्ति, त्याचा कल, सभोंवरच्या वातावरणामुळे त्याची झालेली मानसिक घटना आणि या वृत्तींच्या आणि कलांच्या अनुरोधाने त्याचा बाह्य जगाशीं झालेला संघर्ष अगर संपर्क आणि या सर्वांच्या क्रिया-प्रतिक्रियांनी निर्मित एक विशेष दृष्टिकोण......या सर्व गोष्टींच्या प्रक्रियांनी युक्त असें कलावंताच्या व्यक्तित्वाने बदललेलें विशेष पूर्ण असें तें प्रतिबिंब असतें. मग तें प्रतिबिंब जगाच्या बाह्यरूपापासून निराळें भासणारें स्वप्नजग असेल, अथवा ज्यांत कलावंतांच्या वृत्ती–(Attitudes)चे पलायन-मूलक किंवा निराळ्या प्रकारचें प्रतीकात्मक निरूपण असेल किंवा समाजाच्या घटना-विघटनांचे यथातथ्य प्रामाणिक चित्रण असेल. अगदीं स्वात्म (Subjective) कलेच्या शून्य देशांतील कल्पना-कल्पनांतील किंवा पात्रा-पात्रांतील वायवीय (Ethereal) संबंध देखील समाजाच्या विशिष्ट घडणीचे विशिष्ट मानवीभावनांच्या माध्यमद्वारां आविष्करणच ठरतील; आणि समाजाच्या विशिष्ट वृत्तींचें कोणतें ना कोणतें तरी लक्षण त्यांत व्यक्त होईल. प्रसिद्ध जर्मन कलासमीक्षक म्हणतो—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'Does not the artist know that the play of his imagination is the Shadow-reflex of a materially real, psycho-physical process ? Impressionism from within ? And that every form elaborated by man can be rediscovered in the inexhaustible world of matter, if only the eye can be made penetrating enough and the organs of touch refined enough (by the magic of the magic-apparatus of Science) to discover a connected picture in the cosmos and the way it arose,

(Peter Thoene-Modern German Art, P, 78 A pelican special)

विसाव्या शतकांतील जर्मन चित्रकलेचें समीक्षण करणाऱ्या पीटर थोएने याने चित्रकलेच्या क्यूबिझम (Cubism) सररियालिझम (Surrealism) अधिव्यक्ति-प्रकारांबद्दल लिहितांना वरील उद्गार काढले आहेत. मानवाच्या प्रत्येक कल्पनेचें मूळ कोठें ना कोठें तरी वास्तव जगांत असतें, असें वरील समीक्षकाला म्हणावयाचें आहे.

यांचें मुख्य कारण कलावंत आणि समाज यांचा आंगिक (Organic) संबंध आहे, हेंच होय. केवळ अभूतपूर्व युगाच्या वास्तवतेच्या व वृत्तींच्या बाहेरील मानवी-जीवन-कर्दमाच्या पल्याड साहित्य किंवा कला यांची कल्पना करणें मानवी-शक्तीच्या बाहेरील गोष्ट होय. म्हणून एखाद्या लेखकाचें, कवीचें, अथवा कलावंताचें महत्त्व व वैशिष्ट्य समजून घेण्यासाठी त्याच्या युगाच्या मौलिक वृत्तींचे, ज्या समाजप्रवाहांत जगून तो त्या वृत्तींचें ग्रहण करतो त्याचें, ज्या विशिष्ट वातावरणांत तो वाढला :त्या वातावरणाचें त्याच्या स्वभावाच्या घडणीच्या आणि वृत्तींच्या मानसशास्त्रीय पृथःकरणात्मक ज्ञानाचें आणि सरतेशेवटीं त्याच्या कलाशक्तीच्या प्रकाराचें ज्ञान असणें आवश्यक आहे.

कलावंताच्या साहित्यांत अगर काव्यांत व्यक्त होणाऱ्या द्वंद्वास त्याच्या युगांत चालणाऱ्या द्वंद्वांच्या पृष्ठभूमीवर ठेवलें असतां त्या दोघांतील आंगिक संबंध (Organic relation) स्पष्ट होतो. आणि त्यामुळे विशेष कलाकृतीचें महत्त्व, तिची सीमा यांचे यथायोग्य मोजमाप करतां येतें. परंतु ज्या कलागत व्यक्तित्वाचें पृथःकरण करावयाचें त्या व्यक्तित्वांत ज्या हजारो संबंधांचें, वृत्तींचें दर्शन होतें, ते संबंध आणि वृत्ति ज्या युगाच्या वृत्तींच्या आविष्करण ठरतात, ती युगवास्तवता या गोष्टी इतक्या गुंतागुंतीच्या, विविध पैलूंच्या आणि अनंत असतात की, वर सांगितलेलें मूल्यमापन करतांना कोठें कोठें घोटाळा होणें संभवनीय आहे. परंतु तेवढ्यामुळे ललितवाङ्मयाचें मूल्यमापन करतांना सामाजिक पृष्ठभूमीस रजा देणें योग्य आहे, असें नव्हे.

– २ –

जीवन हें स्थिर नसून गतिशील आहे. त्यामुळें जीवनाचें कलात्मक आविष्करणहि गतिशील असतें. गतिशील जीवनाच्या समानांतर कलेची किंवा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्याची समानांतर रेखा वाहत जाते. कला ही जीवनापासून निर्मित होते आणि त्याचें निर्माण करीत जाते. साहित्य हें मानवी भावनांच्या द्वारें जीवनाचें केलेलें वस्तुगतिकरण (objectification) होय. म्हणून निरनिराळ्या काळीं निर्मिलेलें निरनिराळें साहित्य किंवा कला या असंबद्ध नसतात, तर त्या एक सजीव शृंखला तयार करतात, तीसच आपण साहित्याची किंवा कलेची परंपरा म्हणतों. ही परंपरा सजीव साहित्यानें सकस होते आणि निर्जीव व कसवी साहित्यानें लुली पडते. ही परंपरा कधी उदात्त उत्थान घेतांना दिसते, तर कधी ऱ्हास पावतांना दिसते. ज्या ज्या वेळीं साहित्यपरंपरा ऱ्हास पावते, त्या त्या वेळीं जीवन तुंबलेलें आणि निरनिराळ्या आंतर्बाह्य बंधनांत सांपडून स्थिर झालेलें असतें. अशा काळांत आहे त्या परिस्थितीशीं समेट (compromise) करून जीवन काढणारे कलावंत जी कला निर्माण करतात, ती ऱ्हासाचीं सर्व लक्षणेंच दाखविते. मिल्टननंतर Restoration Period मध्ये मिल्टनचें क्रांतिकारत्व कांहीं तरी उगीच अतिरेकी समजण्यांत आलें. क्रांतीची गळचेपी करण्यांत येऊन परत Monarchy शीं समेट करण्यांत आला. या समेटाच्या मर्यादा ज्यांनी मान्य केल्या, त्या ड्रायडन, पोप आणि तत्सम इतर कवींना कसबी कुशल लेखन करणें आणि Foms कडे लक्ष देणें भाग पडलें. त्या युगांतील क्रांतीची असफलता काव्यांत अशा रीतीनें बिंबित झाली.

ही साहित्यपरंपरा सजीव असते. म्हणजे ती निश्चेष्ट (Passive) नसते. म्हणून जुन्या प्रकारचे रूपप्रकार. (Forms) त्यांची महत्ता आणि त्यांतील सौंदर्यकल्पना यांचा पगडा जनमनावर विलक्षण असतो. कलावंताचा नवा आशय आणि साहित्यांतील गत रूपप्रकार यांची परंपरा यांचें द्वंद्व अखंड चालत रहातें. या द्वंद्वांतून नवे रूपप्रकार जन्माला येतात. कलावंताचा जुन्या साहित्य-परंपरेशीं चाललेला हा संघर्ष मोठा कठोर आणि यातनाप्रद असतो. स्वतःच्या व्यक्तित्वास आणि युगतत्वास अनुरूप असें रूप प्राप्त होतांच शतदलाचीं सर्व दलें ज्याप्रमाणें विकसित व्हावीत, त्याचप्रमाणें कलावंताच्या आशयास बोल प्राप्त होतात. कवि अनिलांच्या काव्यमय व्यक्तित्वाच्या विकासाचें उदाहरण या ठिकाणीं सांगतां येईल. कलावंताच्या आशयास बोल प्राप्त झाले, तरच त्या व्यक्तित्वाच्या आशयाचें साहित्यांत उद्घाटन होऊं शकतें.

जुनीं रूपें झिजून गुळगुळीत झालेल्या नाण्याप्रमाणे बदललेल्या युगांत प्रभावहीन ठरतात. जीवन-तत्त्वाप्रमाणेंच (life-principle) नव्या रूपांचा अविष्कार होतो. निराळ्या दृष्टीने सांगावयाचें झाल्यास सकस साहित्याची उदात्त परंपराच पुढे जीवन-तत्त्वानुरूप नव्या रूपप्रकारांची निवड करते. म्हणून एका विशिष्ट युगांत विशेष कलात्मक प्रवृत्ति (रोमान्सवादी, वास्तववादी इ.) यांना महत्त्व मिळतें आणि इतर अभिव्यक्ति-प्रकार व इतर जीवनतत्त्वें गौण ठरून वास्तविक जीवनांत ज्या गोष्टींवर भर असेल, त्यांच जीवनसत्यावर कलांचाहि भर पडतो. अशा रीतीनें साहित्याची जिवंत परंपराच या अभिव्यक्तिप्रकारांवर नियंत्रण आणते आणि कलावंतच या साहित्याच्या जिवंत परंपरेची निवड करण्यांत हस्तक (Agent) ठरतात. उलट दृष्टीने म्हणावयाचें झाल्यास कलावंत हे नवीं रूपें व नव आशय

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यांनी साहित्यिक-परंपरा घडवितात. दोघांचा एकमेकांवर प्रभाव असतो आणि दोघांच्या द्वंद्वामुळें दोघे बदलतात आणि यांच्या द्वंद्वांतून साहित्याचें रूप ठरत जातें. अनुरूप-अभिव्यक्ति-प्रकार घडवितांना कलावंतास अनंत श्रम आणि निराशा सहन कराव्या लागतात. नवीन अभिव्यक्तिप्रकारांद्वारें ज्यावेळीं कलावंताचा तुंबलेला जीवनाशय मोकळा होतो (Release); त्याचवेळीं कलावंत पूर्ण स्वतंत्र होतो. कलावंताने कितीहि जरी स्वतःच्या साहित्यनिर्मितीची तुलना कोकिळेच्या अनायास गाण्याशीं किंवा निर्झराच्या नर्तनाशीं करून असें सांगितलें की, मी का लिहितों हें माझें मलाच कळत नाही, त लेखन उचंबळून आपोआप (Spontaneous) प्रकट होतें तरी कलावंताच्या आशयाच्या उद्घाटनामागे वरील प्रक्रियाच असते. कलावंताचा वरील कलानिर्मिताचा दृष्टिकोण केवळ इच्छापूर्तिमूलक (Wish-fulfilment) असतो. कलावंताच्या स्वातंत्र्याचें मर्म वरील प्रकारचेंच आहे. कलावंतास ज्याप्रमाणे स्वतःच्या वृत्ती आणि सामाजिक विकसनशील वृत्ती यांचा समन्वय साधण्यास धडपडावें लागतें, त्याचप्रमाणे या जिवंत साहित्यपरंपरेशीं झुंजून नवीन अभिव्यक्ति-प्रकारांना उदयास (evolve) आणावें लागतें. तोंवर पहाडाच्या वक्षःस्थलांत लपलेल्या निर्झराप्रमाणे त्याचा आशय अप्रकट राहतो, सारखा झुंज करींत राहतो आणि त्या वेळीं त्याने निर्मिलेलें वाङ्मय परंपरागत म्हणून कमी प्रभाव-शाली ठरतें. तें महान् होऊं शकत नाहीं.

– ३ –

कलावंत केवळ असह्य झालेल्या आशयाचें उद्घाटन करतो, हें म्हणणें चुकीचें वाटतें. ही कलात्मक प्रक्रिया तर साहित्य आणि ललितकला यास इतर कलांपासून निराळी करते. वरील प्रकारचा भावनात्मक आविष्कार आहे, असें सांगितल्याने त्या आविष्कारपद्धतीवर कोणताच प्रकाश पडत नाही आणि कलेच्या समीक्षेला कोण-ताच माप दंड लाभत नाही. या उत्तरामुळे कलेबद्दल कोणतीच नवीन गोष्ट सांगि-तली जात नाही केवळ भावना असह्य झाली. (मग ती कितीहि क्षुल्लक कारणा-मुळे असो) व आविष्कृत झाली, म्हणजे ती उत्कृष्ट कला ठरतें, हें म्हणणें विचित्र आहे. वयःसंधीच्या काळांतील प्रियेबद्दलच्या काल्पनिक प्रेमगीतांतील अतिभावुकता आविष्कृत झाली (या वयांतील भावभावनांचे तटस्थ दृष्टीने वर्णन निराळें असेल, हें स्पष्ट आहे) कीं, ती उत्कृष्ट कला ठरेलच, असें नव्हे. कारण भावनेची खोली, तिचें महत्त्व–या सर्व गोष्टींनी काव्याचा उच्चनीचपणा मोजावा लागतो. कारण कवीच्या जीवनमूल्यांचा तलास त्यामुळे लागतो. कवीच्या मनांतील तळमळ कशामुळे होती, तिचें महत्त्व काय, याचा तलास लावण्यासाठी आपणाला कवीच्या मनाची पृष्ठभूमि लक्षांत घेणें भाग आहे. केशवसुतांच्या मनाची तळमळ कोणत्या प्रकारची होती, का होती, त्यांना वाटणारा आवेश अगर निराशा कोणत्या कारणामुळे उत्पन्न झाली, त्यांनी निरूपिलेलीं स्वप्नें, त्यांनी केलेली नारीपूजा आणि या सर्वांतून प्रकट होणारें त्यांचें व्यक्तित्व-त्यांच्या व्यक्तित्वांतील द्वंद्व व त्या द्वंद्वांस निर्माण करणारी सामाजिक पृष्ठभूमि या गोष्टी कळल्याशिवाय केशवसुतांचें महत्त्व, त्यांच्या संदेशाचें महत्त्व व म्हणून त्यांच्या काव्याचें महत्त्व समजणें अशक्यप्राय होय, या सर्व गोष्टींना बगल दिल्यास

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केवळ ठोकळ वर्गवारी लावण्यापलीकडे आणि 'तडफड,' 'तळमळ,' 'आवेश'— हे शब्द उच्चारण्यापलीकडे किंवा 'उत्कृष्ट,' 'हिणकस' अशा प्रकारची टीका करण्यापलीकडे आमचे समीक्षक कांही करूं शकणार नाहीत! अशा प्रकारच्या मोघम प्रभावादी समीक्षे (Impressionitic-Criticism) ला मूठमाती द्यावयाची असल्यास वरील सर्व गोष्टी लक्ष्यात घ्यावयास हव्या.

'सतारीचे बोल' या कवितेंत व्यक्त होणारें विशादपूर्ण गंभीर व्यक्तित्व सोडून दिल्यास या काव्याची उच्चता (Loftiness) नष्ट होते. त्या थोर विषादाचें रूपच त्या कवितेचें महत्त्व ठरवितें. बायरनच्या काव्यशक्तीबद्दल कोणां संशय घेईल, असें वाटत नाही. त्याच्या आविष्कार-शक्तिमुळेच त्याला विलक्षण लोकप्रियता लाभली आणि गेटे (Goethe) या जर्मन कवीला त्याची प्रशंसा करणें भाग पडलें परंतु बायरनची जीवनाबद्दलची नास्तिक आणि अनुदार वृत्ति, स्त्रीबद्दल अवहेलना या गोष्टी त्याला त्याच्या उच्च पदवीपासून खाली आणल्याशिवाय राहात नाहीत. अत्रे यांच्या सामाजिक नाटकांतील सामाजिक ढोंगाचा उपहास ज्या भूमिकेवरून केला आहे, ती भूमिका आणि शॉ यांची भूमिका यांत जमीन अस्मानचें अंतर आहे. या दोन्ही भूमिकांतून दोन निरनिराळीं व्यक्तित्वें प्रकट होतात. दोघांनी आविष्कार योग्य केला असेल, परंतु शॉ यांच्या नाटकांतून प्रकट होणारें जीवना-विषयींचें आस्तिक्त्व आणि अत्रे यांचें कोणत्याहि गोष्टीची टवाळी करणारें नास्तिक व्यक्तित्वच त्यांच्या कलेचा उच्चनीचपणा ठरवितात. दोघांना एकाच पातळीवर कोण बसवील? म्हणून आविष्काराच्या मागे कोणतें व्यक्तित्व, कोणती वृत्ति, कोणतें वातावरण, परिस्थिति आणि सामाजिक तत्त्व दिग्दर्शित होतें, हें पाहाणें जरूर आहे.

केशवसुतांच्या काव्यगत व्यक्तित्वांत तत्कालीन युगाचें द्वंद्व स्पष्टपणें बिंबित होतें. इंग्रजी सत्तेमुळे हिंदुस्थानांतील सरंजामदार वर्गाची बऱ्याच ठिकाणीं इतिश्री होऊन भांडवलशाही समाजाची स्थापना झाली. परदेशी भांडवलशहांनी हिंदुस्थानचें कांही ठिकाणीं औद्योगिकरण केलें आणि हिंदुस्थानची कांही काल यंत्रप्रगतीच्या दृष्टीने प्रगति झाली. या सामाजिक क्रांतिमुळे नवीन सांस्कृतिक क्रांतिदेखील घडून आली. व्यक्तिस्वातंत्र्य, निसर्गपूजा, नारीपूजा इत्यादि आदर्शवादी (Idealistic) मूल्यांची स्थापना झाली. अगोदरच श्रीमंत असलेल्या उच्चवर्गातील व्यक्ति सुसंस्कृत झाल्या आणि या नव्या दृष्टिलाभाने त्यांनी या नवीन मूल्यांचा 'उदो उदो' केला. परंतु परदेशी भांडवलशाहीने जरूरीपुरतें औद्योगीकरण केलें खरें, परंतु त्याच्या अगोदरच ईस्ट इंडिया कंपनीच्या लुटारूंनी समस्त भारतवर्ष लुटून फस्त केला होता आणि त्यामुळे झालेल्या इंग्लडांतील औद्योगिक क्रांतिमुळे, हिंदुस्थानची बाजारपेठ करून त्या रूपाने शोषणाची तयारी नवीन यंत्रांच्या साहाय्याने, इंग्रजांनी केलेली होती. त्यामुळे शेतकरी आणि मध्यमवर्ग कफल्लक झाला होता. इंग्रजानी हिंदी भांडवलवाल्याना कांहीसें हाताशीं धरलें असल्यानें वरच्या वर्गाची बरीच आर्थिक प्रगति झाली. सांस्कृतिक दृष्ट्या तर प्रचंड क्रांति आणि प्रगतिपोषक विचारसरणी निर्माण झाली होती. आर्थिक सुबत्ता आणि प्रगतिपोषक नवीं मूल्यें यांच्या मिलाफाने त्या वर्गातील कलावंतांचा जीव नवीन जीवनाच्या आशेने केवळ बहरून

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आता. या नव्या युगाच्या स्वागतार्थ रवीन्द्र जुन्या सरंजामदारी रूढी नष्ट करण्यास आपल्या ' निर्झरेर स्वप्न-भंग ' या कवितेंत उल्हासाने म्हणतात.—

भाङ् भाङ् भाङ् कारा
आघाते आघात कर
ओरे आज की गान गेये छे पाखी ऐसे छे रबीर कर.

रवीन्द्रनाथांच्या काव्यांत जो आनंद, उल्हास, निसर्गाच्या आणि नारीच्या गूढ सौंदर्य-रूपाशी जी उल्हसित तन्मयता दृष्टीस पडते आणि त्यांच्या काव्यांत जो प्रचंड ओघ, अनंत कल्पनाशक्ति आणि टवटवी वाटते, ती वरील कारणांमुळेच होय. कुंठा, विषाद, हळवी, भित्री प्रीति, अभाव यांच्या जागीं त्यांच्या काव्यांत तृप्ति, प्रसन्नता, नारी आणि निसर्ग यांचे उदात्तीकरण (Sublimation) आणि आदर्शीकरण (Idealization) प्रकट होतें. नाना-वर्ण गंधमय प्रदीपाप्रमाणें त्यांचें काव्य अनंत रंगांत प्रकट झालें आहे.

इंग्रजी सत्तेबद्दल तिरस्कार त्यांच्याहि ठायीं वसत होता. त्याबद्दल त्यांनी तीव्र तिरस्कारहि व्यक्त केलेला आहेत. परंतु इंग्रजांच्या शोषणाचा प्रहार त्यांच्या व्यक्तित्वाच्या मुळाशीं कोठेच न बसल्याकारणाने आणि त्यांची काव्यस्वप्नें (Illusions) त्यांच्या काळच्या सामाजिक प्रगतिशील स्वप्नांशी सुसंगत असल्याने त्यांचें व्यक्तित्व निःसंशय, अखंड व अक्षत राहून काव्यांतून दुर्दम उल्हासानें प्रकट झालें आणि ते एक आदर्शवादी, विश्वात्मवृत्तीचे द्रष्टे होऊं शकले.

परंतु त्यांच्याच काळांत काव्यरचना करणाऱ्या केशवसुतांच्या व्यक्तित्वाची घटना निराळी होती. केशवसुतांच्या वर्गातील कवीच्या वाट्यास ती परितृप्ति, ती प्रसन्नता, तो निर्मळ आनंद येणें अशक्य होतें. भारतीय मध्यम वर्गाची स्थिति गरीबीची झालेली होती. भारताची औद्योगिक आणि सांस्कृतिक प्रगति पूर्वीच्या मानाने जरी प्रचंड प्रमाणावर झालेली होती, तरी मध्यम वर्ग आर्थिक कात्रीच्या कचाट्यांत केव्हाच सांपडला होता. म्हणून इंग्रजी सत्तेबद्दल प्रचंड असंतोष, ठेचल्या गेलेल्या व्यक्तित्वांची स्वानुभवाची तळमळ, हिंदुस्थानच्या दारिद्र्याबद्दल तीव्र घृणा त्याकाळीं प्रकट व्हावयास लागली होती. त्याचा परिणाम आदर्शवादी सांस्कृतिक मूल्यें असतांहि मध्यमवर्गीयांवर होणें अपरिहार्य होतें. रवीन्द्रनाथ पुरातन ऋग्वेद परंपरेपासून स्फूर्ति प्राप्त करून आदर्शवादी महान् अखंड-भारताचीं स्वप्नें रचीत खालील शब्दांत सर्वांना हिंदुस्थानांत आमंत्रित करीत होते—

एशो हे आर्य, एशो अनार्य हिंदु मुसलमान
एशो ऐशो आज तुमी इंग्राज, एशो एशो क्रिस्टान.

तर आदर्शवादी विचारसरणीचे, पण वास्तविक अनुभवाने प्रेरित केशवसुत म्हणत होते—

जोर मनगटांतला पुरा घाल घाल खर्चा
मार टोमणा चळ न जरा अचुक मार बर्चा

आणि स्वतःच्या वाङ्मयीन कार्याच्या उद्देशाबद्दल ते स्पष्ट म्हणतात—

शब्दशक्तिची तरफ आमुच्या करीं विधीने दिली असे
टेकुनी ता जनताशीर्षावरि जग उलथुनिया देऊं कसें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आदर्शवादी मूल्यें आणिक वास्तविक जीवन यांच्यांतील द्वंद्वांतच केशवसुतांच्या काव्याची घटना सांपडते. केशवसुतांची वृत्ति बालपणापासूनच अंतर्मुख आणि परिपक्व अशी होती. सौंदर्याची इंद्रियगम्य (Sensous) बाजू पाहाण्याची फुलपाखरी वृत्ति त्यांची नव्हती. सौंदर्याची, प्रीतीची सार्वभौम दैवी बाजू पाहण्याकडे त्यांचा कल होता. स्वत:च्या व्यक्तिगत–म्हणून वर्गगत परिस्थितीने, स्वत:च्या हळव्या आणि चिंतनात्मक वृत्तीने जगाकडे पाहावयाचा तटस्थ असा दृष्टीकोण त्यांना लाभला होता. म्हणूनच बाह्य राष्ट्रीय जीवनाचें आणि सामाजिक जीवनाचें भविष्य ते नीट पाहूं शकत होते. लहानपणापासून त्यांच्या अंतर्मुखतेचा आणि डामडौलाच्या अभावाचा परिचय होतो. पंतोजींनी ‘ रडक्या तोंडाचा ’ म्हटलें असतां ‘ माझें तोंड रडकें दिसलें, तरी माझ्याच मुखांतून सरस वाङ्‌निष्यंद पुढे वाहावयाचा आहे-कवि दिसावयास कसा होता, हें पुढील पिढी विचारणार नाही ! ’ – अशी स्वत:च्या जीवित—कार्याविषयींची जागरूकता त्यांनी लहानपणापासून प्रकट केली होती. पारतंत्र्याचा प्रभाव त्यांच्या तर जीवनावरच होत होता. त्यांच्या वस्तुदर्शी दृष्टीकोणाने आणि पारतंत्र्याच्या विलक्षण चिडेमुळें त्यांच्या व्यक्तित्वाचा अत्यंत प्रखर आणि दाहक पैलू प्रकट झाला. परंतु त्यांच्या काळच्या आदर्शवादी विचारसरणीमुळे त्यांच्या काव्याचें मूळ आदर्शवादी जरीं राहिलें, तरी त्यांच्या काव्यांतील आशय अगदीं नवा आणि प्रतिभासृष्टि मौलिक अशी निर्माण झाली. लोकांना जागृत करणारी ‘तुतारी’ त्यांच्या हृदयाला लागलेली तळमळ व्यक्त करते, एवढें सांगून भागावयाचें नाही. एवढें म्हटल्याने त्या कावितेचें महत्त्व कळावयाचें नाही. तर, राष्ट्रीय जागरणाच्या काळांत दडपल्या जाणाऱ्या मध्यम वर्गाची ती विलक्षण प्रभावी अशी क्रांतिवादी हांक होती आणि भव्य स्वप्न होतें, असें सांगितलें, म्हणजेच त्या कवितेचें महत्त्व कळेल. म्हणूनच त्या कवितेने अखिल महाराष्ट्राच्या मध्यम वर्गास वेड लावलें आणि एक परंपरा स्थापित केली. हा नवा आशय व्यक्त करावयास केशवसुतांना नवीं काव्यरूपें शोधावीं लागलीं, जुना दृष्टिकोण सोडावा लागला. बदललेल्या जीवनानुसार बदललेली वृत्ति, बदललेलीं मूल्यें ठळक रूपाने केशवसुतांच्या काव्यांत दिसतात. केशवसुतांच्या अनुभूतींच्या भट्टींत ही जीवनाची वास्तवता तापून लाल झाली आणि स्वत:च्या स्वतंत्र प्रज्ञेच्या हातोड्याने त्यांनी त्या अत्युष्ण जीवनाशयाला अभूतपूर्व रूप दिलें. कला अगर कविता जर व्यक्तिनिष्ठ असेल, तर ती या स्वात्मप्रक्रियेच्या (Subjective process) दृष्टीनेच होय. ही स्वात्मप्रक्रिया म्हणजे व्यक्तिवादिता (Individualism) नव्हे. व्यक्तिनिष्ठता आणि व्यक्तिवादिता या दोन परिकल्पनांत (Concepts) विद्वान् मंडळी देखील घोटाळा करितात आणि या घोटाळ्यास आधारभूत धरून स्वसमर्थनार्थ चुकीचे सिद्धांत काढतात.

केशवसुतांच्या ओजस्वी कवितेंतून जसा त्यांच्या व्यक्तित्वाचा जळजळीत पैलू दिसतो आणि त्यांच्या जीवनमूल्यांचा परिचय होतो, त्याचप्रमाणें त्यांच्या व्यक्तित्वाचा दुसरा पैलू देखील त्यांच्या काव्यांतून स्पष्ट दिसतो. केशवसुतांच्या वस्तुदर्शी (objective) प्रज्ञेला म्हाताऱ्या सर्पाप्रमाणें कात टाकणारा भारतवर्ष जरी दिसत होता, तरी त्यांचें स्वत:चें व्यक्तिगत जीवन हें अभावग्रस्त असें होतें,

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

इंग्रजी ‘ Romantic ’ काव्याच्या अनुशीलनाने त्यांनीं आत्मलेखनात्मक काव्य केलें. परंतु तीं मूल्यें आदर्शवादी असल्याने स्वत:बद्दल विशेष असें त्यांनी लिहिलें नाही. अशरीरी अशी उदात्त प्रणयगीतेंच त्यांनी लिहिलीं आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या मूल्यानुसार उच्च पातळीवरील दोन व्यक्तींच्या उदात्त मीलनाचीच कल्पना त्यांना पसंत होती. म्हणूनच मोठ्या तटस्थ दृष्टीने आणि उच्च पातळीवरून प्रेमाचीं व प्रणयाचीं गाणीं त्यांनी गाइलीं. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर प्रसृत व्यक्ति-मुक्तीच्या (Freedom of the individual) मूल्यांवरच आधारलेली ती प्रणयकल्पना होती. आत्मलेखनात्मक पद्धतीने लिहिलेलीं सर्व गीतें (Positive) मूल्यांची स्थापना करतात. निसर्ग, नारी आणि सौंदर्य यांवर केशवसुतांनी लिहिलें तें भांडवलशाहीच्या उत्थान काळांतील नव्या मूल्यांवरच ! परंतु या उत्थानाबरोबर आर्थिक शोषण होऊन मध्यम वर्ग कफल्लक झाला होता. त्या काळचें हिंदी इसमाचें सरासरी जास्तीत जास्त उत्पन्न ३० रु. होतें. त्यामुळे वास्तविक सामाजिक क्रांति होऊनहि जी टवटवी केशवसुतांच्या जीवनांत यावयास हवी होती तिचा मागमूसहि त्यांच्या जीवनांत—म्हणून इतर काव्यांत आढळत नाही. त्यांच्या व्यक्तिजीवनांत त्यांच्या काव्यमय आकांक्षांस अनुसरून कसलीहि परितृप्ति लाभली नाही ! सामाजिक उत्थानाच्या ऐतिहासिक जरूरीमुळे त्यांच्याकडून जी नारीविषयक, निसर्गविषयक आणि अंतिमसत्ताविषयक कविता निर्माण झाली, तिचीं मूल्यें ‘ Positive ’ अशींच होतीं. परंतु कवीच्या व्यक्तिजीवनांत जो विषाद (चिंतनप्रवृत्तीने अधिक गहन झालेला) आणि एक प्रकारची खोल निराशा साचली होती, त्यामुळे त्यांची प्रणय–कविता बौद्धिक (मध्यवर्गीय समाजांतील स्त्री–पुरुष–भेद याला मूळ कारण) आणि त्यांची गूढ-गुंजनात्मक कविता अभावाच्या हुरहुरीची द्योतक ठरली. त्या अभावाचें नक्की कारण न कळल्यामुळे त्या अभावाचें उदात्तीकरण करण्यांत आलें. या अभावात्मक जीवनामुळे त्यांच्या उज्ज्वल काव्यांतील कित्येक कवितांत एक ‘ अकथ ’ विषादाची छाया पसरली ! ‘गोष्टी घराकडील मी वदतां गड्या रे’ या कवितेची सहजच आठवण या वेळीं होते. Positive प्रगतिपोषक मूल्यें आणि अभावात्मक व्यक्तिजीवन यांच्या द्वंद्वामुळे आणि या कोंडींतून मार्ग काढण्या-इतकी त्या काळची राजनैतिक जागृति नसल्याने केशवसुतांचें काव्य उदात्त पण करुण, प्रेमळ पण हळवें असें निपजलें. या हळवेपणाचा प्रणयाशीं संबंध जोडून माडखोलकरांसारख्या समीक्षकांनी त्यांना स्त्रैण ठरविलें ! स्त्रैणपणाचें लक्षण केशवसुतांच्या काव्यांत कोठेहि दिसून येत नाही. बौद्धिक उदात्त तात्त्विक प्रेमगीतेंच वाचावयास मिळतात. ज्या कारणामुळे केशवसुतांच्या काव्यांत एक प्रकारची बौद्धिकता आली, त्याच कारणाने त्यांच्या काव्यांत एक जळजळीत देशाभिमानहि अवतरला आणि नव्या युगाचा संदेश जन्माला आला. केशवसुतांच्या दोन्ही वृत्तींचा एकमेकांवर प्रभाव आहे. ज्यावेळीं केशवसुत व्यक्तिगत जीवनाच्या वर जातात, त्या-वेळीं त्यांच्यातील संदेहात्मकता नष्ट होऊन एक आत्मविश्वास दृष्टीस पडतो आणि विषादाचें धुकें पसरतांच एक ‘अकथ’ पीडा त्यांच्या काव्यांत डोकावते ! ती पीडा व्यक्तिगत असूनहि वर्गगत आहे, म्हणून विशाल आहे. ‘ सतारीचे बोल ’ या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कवितेंत याच थोर विषादाचा आविष्कार आहे. ब्राऊनिंग आपल्या 'Abt Vogler' या काव्यांत गायनाच्या सखोल प्रभावाबद्दल लिहितांना म्हणतो.—

For earth had attained to heaven,
There was no more near nor far

संगीताने जीवनांतील असीमत्व त्या अनंताशीं सायुज्यता पावतें. केशवसुतांच्या वरील कवितेंतील त्यांचा असीम भासणारा विषाद म्हणूनच संगीतांत शरण जातो आणि त्यांचा आत्मा विश्वमय (असीम) झाल्याचा भास होतो. संगीतामुळे त्यांच्या गंभीर विषादास किंचित् विराम मिळतो. असो.

केशवसुतांच्या जळजळीत काव्याच्या द्वारां पुढील मध्यवर्गीय क्रांतिकारक आंदोलनांचा जन्म व्हावयाचा होता आणि टिळकांचें राजकारण यावयाचें होतें. केशवसुतकालीन उत्थानमूलक सांस्कृतिक मूल्यें, विद्रोहमूलक क्रांतिमूल्यें, मध्यवर्गीय अभावजन्य कारुण्य यांचा तत्कालीन समाजांत आविष्कार होत होता. आणि त्यांचाच प्रभाव स्वतःच्या युगाच्या आणि वर्गाच्या सीमेने सीमित केशवसुतांच्या काव्यांत प्रकर्षाने आढळतो. म्हणूनच त्यांचें काव्य मराठी वाङ्मयांत श्रेष्ठ समजलें जात आहे. त्यांच्या काळीं काव्यरचना करणाऱ्या उच्चवर्गीय रवींद्रांच्या काव्यांत-व्यक्तिजीवनाच्या विकासास क्षेत्र मिळाल्यामुळे-विलक्षण टवटवी, उल्हास, आनंद आढळतो. त्यांच्या रहस्यवादी काव्यांत अज्ञेयाला 'ज्ञेय' म्हणूनच आनंदमय मानलें असून त्या अज्ञेयाचें गूढत्व उकलण्यांतच ब्रह्मानंद मानला आहे. अज्ञेय अज्ञेयच राहाणार, त्याचा उकल करणें बुद्धीच्या पलीकडे आहे, असें म्हणणारे रवीन्द्र नव्हते. परंतु केशवसुतांचें गूढ गुंजन मात्र त्यांच्या विषादाचें घनीभूत आणि उदात्तीकृत रूप आहे. हर्ष-खेद मावळून एक प्रकारचें वीतरागत्व कवि अनुभवतो.

रवीन्द्रांचें प्रवृत्तिवादी काव्य म्हणूनच अत्यंत सुंदर इंद्रियगम्य (Sensuous) प्रतिमासृष्टीने प्रसन्न झालेलें आहे, तर केशवसुतांची कल्पनासृष्टि बरीच अमूर्त (Abstract) अशी आहे. रवीन्द्रांच्या राष्ट्रीय काव्यांत एक उदात्त कल्पनाशक्ति, द्रष्टेपणा आणि एक मानवतावादी करुणा आढळते. तडा गेलेल्या जीवनाचे दमित अर्धस्फुट उद्गार त्यांच्या काव्यांत मिळावयाचे नाहीत. एकाच युगांतील आणि एकाच सांस्कृतिक मूल्यांचे समर्थक कलावंत भिन्नवर्ग आणि भिन्न वातावरण यांमुळे किती भिन्न असूं शकतात, याचें जिवंत उदाहरण म्हणजे केशवसुत आणि रवीन्द्र यांच्या काव्यांतील व्यक्तित्वें होत. स्वातंत्र्योन्मुख बंडखोरीचीं प्रगतिमूल्यें आणि अभावात्मक जीवन यांच्या परस्पर संपर्कातच केशवसुतांच्या काव्याच्या मर्यादा सांपडतील.

रेनर मारिया रिल्के (Rainer Maria Rilke) या प्रसिद्ध जर्मन कवीचें उदाहरण एका अगदी निराळ्या प्रकारच्या परिस्थितील निराळ्या स्वभावाच्या व्यक्तित्वाचा विकास कसा होतो, हें दाखविण्यास उपयोगी पडेल. जर्मनींतील समाजांतील स्वप्नभंग, निराशा इत्यादि वृत्तींमुळे रिल्के याची तृप्तिपूर्णता असामाजिक झाली होती. या सामाजिक परिस्थितींतून existentialism नामक विचारधारा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तत्त्वज्ञान साहित्य व ललितकला यांत प्रसृत झाली. मानव हाच Absolute value परममूल्य असून तो स्वतंत्र आहे; विवाह, कुटुंबसंस्था, किंवा व्यवस्था या पासून त्याला पूर्ण मोकळें व्हावयाचें आहे, अशा प्रकारचें या तत्त्वज्ञानाचें मूलबीज आहे. ('Modern quarterly autumn 1947 existentialism) हेंच तत्त्वज्ञान ललितकलांत निराळ्या रूपांत अवतरलें.

"A new private world was built, with deepened sincerity and an aristocratic rhythm of life directed against the tumult of cities and scramble, for money— 'Malte Lawrids Brigge' by Rainer Maria Rilke—is the manifestation of this."

('Modern German Art,' p. 45) —Peter Thoene.

समाजाचीं सर्व उत्पादनाचीं साधनें मूठभर भांडवलशहांच्या हातीं असल्यामुळे मानवी मूल्यांचा झालेला मृत्यू आणि त्या Bourgeois वर्गाचा निर्लज्जपणा यांमुळे निराश होऊन रिल्के जीवनाचा तिरस्कार करूं लागला. वास्तवजीवनापासून दूर झालेल्या व्यक्तित्वाची घोर निराशा आणि मरणपूजा रिल्के याच्या काव्यांत व्यक्त झालेली आहे. सामाजिक ऱ्हास (Decadence) आणि नाशाच्या काळांत वृत्तीने दुर्बळ असलेल्या अशक्त माणसाची असह्य तळमळ, मरणाचीं स्वप्नें रिल्केच्या काव्यांत प्रामुख्याने आढळतात. रिल्के हा लहानपणापासून रोगट आणि अशक्त असा होता. त्यामुळे वास्तवजीवनांतील कर्ममय जीवनाबद्दल एक भीषण भय त्याला वाटत असे. त्यामुळे साहजिक त्याचें जीवन एकाकी, विषादमय आणि निराश असें झालें आणि मृत्यूशीं त्याची एक आपुलकीची आणि रहस्यमय मैत्री झाली आणि मृत्यूशीं त्याच्या हृदयाचा संवाद होऊं शकला. वास्तवजीवन बलवान्, कठोर, विद्रूप आणि संकटमय वाटत असल्याने रिल्के याने आपली नवीनच स्वप्नसृष्टि निर्माण केली आणि तींतच त्याच्या आत्म्याची परितृप्ति वाटूं लागली. परंतु लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही की, ती स्वप्नसृष्टि वास्तवजीवनावेगळी सौंदर्यसृष्टि नव्हती, तर तीच जीवनाबद्दलची घोर निराशा आणि तिरस्कार, अशक्तता, थकवा, मरण आणि व्यक्ति नियतीच्या क्रूर बंधनांत बद्ध असा दुर्दैवी प्राणी आहे, ही वृत्ति त्याच्या काव्यांत बिंबित झाली. स्वतःला गांजणाऱ्या समंधापासून तेथेहि तो सुटूं शकला नाही!

ढासळणाऱ्या आणि कुजणाऱ्या म्हणून अत्यंत प्रतिक्रियावादी अशा भांडवलशाही समाजांत रिल्के यास मान, 'उष्मा,' किंवा परितृप्ति लाभणें केवळ अशक्य होतें. कफल्लक रिल्के त्या समाजांतला असूनहि त्यांतून हद्दपार झालेला होता. त्याच्या स्वतःच्या 'The note book of Malte Laurids Brigge' या पुस्तकांत त्याचें रूप त्याच्या मनांत ठसून दलितांबद्दल एक फुकाची नपुसक सहानुभूति त्याच्या मनांत होती. जीवनशक्ति प्राप्त करण्याचे सर्व मार्ग बंद झाल्याने त्याच्या जीवनांत घोर दुःखाच्या यातना निर्माण झाल्या. म्हणून त्याच्या कवितेंत सूक्ष्म संवेदना, नाजुक भावना, जगावेगळे निराशेच्या छायांनी भीषण झालेलें असें जग प्रकट झालें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

समाजाशीं संबंध असल्याने अनंत सुजन शक्ति आणि सतत जीवन शक्ति प्राप्त करणाऱ्या शांत आणि जीवनाबद्दल आस्तिक भावना असलेल्या विकसित व्यक्तित्वाच्या विरुद्ध दमित, कुंठित, दीन-हीन परंतु अहंवादी, मृत्युपूजक स्वतःच्या पीडेचाच आस्वाद घेणारें असे रिल्के यांचें व्यक्तित्व होतें.

मार्क्सने केलेली व्यक्तित्वाची व्याख्या अत्यंत महत्त्वपूर्ण वाटते. स्वतःच्या व्यक्तित्वास सामाजिक प्रगतिशील जीवनांत पसरून स्वतःचे व्यक्तित्व बळकट करणारा सामाजिक जीवनाच्या सक्रिय सहकाराने व्यक्तित्वाची संवादी घटना करून घेणारा आणि त्यामुळे जीवनास आणि निसर्गास अधिकाधिक मानवीय रूप देणारा मनुष्य, स्वतःच्या व्यक्तित्वाचें सतत वस्तुगतीकरण परिस्थितिवर त्याने झगझगात प्रकाश टाकला आहे. स्वच्छ नखे केलेला, कडक कॉलर आणि टापटीपीचा पोशाख केलेला, अशक्त आणि उदासवाणा रिल्के पॅरिसच्या गरीब मोहल्ल्यांतून तेथील लोकांच्या मळकट, घाण कपड्यांशीं अंग घाशीत फिरतो. आणि गरीबीबद्दल एक भयानक वितृष्णा त्याच्या मनांत उत्पन्न होते. उच्च वर्गाचें रक्त त्याला गरीबीच्या बाह्य ओंगळ रूपाकडेच पाहावयास लावतें. ज्या वर्गांत तो मिसळतो, त्याच्यांत मिसळूनहि तो अत्यंत एकाकी असाच राहतो. त्या लोकांच्या श्रमांत त्याचा सहकार नसल्याने आणि त्यांच्यांत मिसळण्याइतकी जीवन-शक्ति नसल्याने आणि उच्चवर्गीय अहंकार असल्याने त्याला दलित वर्गाची महत्ता, त्या वर्गातील लोकांचा मूळ इमानी स्वभाव आणि त्या वर्गाचे महान् ऐतिहासिक क्रांतिकारक कार्य यांना तो कधीच समजूं शकला नाहीं. म्हणून गरीबीनें बाह्य ओंगळ (objectification) करीत असतो आणि स्वतःच्या व्यक्तित्वास सतत सकस, विकसित, खोल आणि शक्तिशाली करीत असतो. रिल्केचें व्यक्तित्व याच्या उलट होतें. त्याचा पलायनमूलक स्वप्नसृष्टि आणि वायवीय जग, (Ethereal) वरील प्रकारच्या प्रक्रियेपासून संपूर्ण भिन्न म्हणून निकस, व्यर्थ श्रीहीन असें होतें. असें काव्य विशिष्ट आणि विचित्र म्हणून साहित्याचा एक (Phenomenon) ठरेल, परंतु तें जीवनांत स्फूर्ति, महत्ता, आणि आस्तिकता कधीहि आणूं शकणार नाही. असें काव्य महान् होणार नाहीं.

व्यक्तिगत वृत्ति, वर्गभावना, सामाजिक घटना आणि वृत्तिविशेष यांमुळे निर्माण झालेला समाजाकडे पाहावयाचा विशिष्ट दृष्टिकोण त्यामुळे निर्मित प्रतिमाचयन या सर्व गोष्टी साहित्य आणि ललितकला यांस त्याचें रूप आणि गुण देण्यास कारणीभूत होतात. म्हणून कलासमीक्षेचीं मूल्यतत्त्वें वरील गोष्टींत सांपडतील. त्यांना नजरेआड करून कोणत्याहि कलाकृतीचे महत्त्व आणि सीमा कळणें अशक्य होय.

मागे सांगितल्याप्रमाणें साहित्याची परंपरा युगतत्त्वानुसार विकसित होते आणि म्हणूनच युगतत्त्वानुसार साहित्याच्या वृत्तींना व अभिव्यक्ति प्रकारांना कमी–अधिक गौणत्व येतें, याचा खुलासा वर केलेलाच आहे. हें मान्य केल्यास पुरोगामी विचार-सरणी कलावंताच्या स्वातंत्र्यावर गदा आणते, या कल्पनेचाहि भोपळा फुटेल.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उदय झाला. ड्रायडन आणि पोप यांच्या कसबी काव्याच्या विरुद्ध हा विद्रोह होता. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर ईस्ट इंडिया कंपनीने हिंदुस्थानची फार मोठ्या प्रमाणावर पिळणूक करून जें भांडवल फुगविलें, तें नव्या शोधांच्या आश्रयाने व्यापाराला नवा मार्ग शोधूं लागलें आणि स्वतंत्र व्यापाराचा (Free Trade) उदय झाला आणि अशा रीतीने हिंदुस्थानच्या बळावर जी औद्योगिक क्रांति (Industrial Revolution) सुरू झाली. हीच क्रांति काव्यांत शिरली आणि एका सुखी समाजाचें स्वप्न लोकांच्या डोळ्यापुढे उभें राहिलें. तें जीवन अजून अस्तित्वांत यावयाचें होतें. 'रोमँटिक' काव्याने याच समाजक्रांतीचें स्वप्न (Illusion) लोकांच्या डोळ्यासमोर ठेवलें. रोमँटिक इंग्रजी काव्य आणि समाजाचें प्रगतिशील स्वप्न यांच्यांत तफावत नव्हती. तर संवाद होता. याचा अर्थ असा कीं, रोमँटिक काव्याचें मूळ समाजांत खोलवर रुजलेलें होतें. ड्रायडन व पोप यांच्या काळच्या काव्यानंतर रोमँटिक वृत्तीचें काव्य आलें, तें त्यावेळच्या राजनैतिक संस्थेने त्यांच्यावर लादलेलें नव्हतें, तर साहित्याची प्रगतिशील परंपराच ही निवड करीत होती.

परंतु भांडवलशाही समाजरचनेचा अंतर्विरोध (Internal Contradiction) स्पष्ट होऊं लागला. आणि सामाजिक उत्पादनाचीं साधनें आणि व्यक्तिगत मालकी यांच्यामुळे समाजाची सर्व संपत्ति कांही व्यक्तींच्या हातांत साठूं लागली. त्यामुळे समाजांत 'अठरा विश्वे दारिद्र्य' नांदूं लागलें आणि पूर्वीचा प्रगतिशील असलेला व्यापारी वर्ग शोषक ठरला आणि त्यांची संस्कृति व समाज दंभ आणि फसवणूक यांवर आधारला गेला. हा त्यांत गुणात्मक बदल (qualitative-difference) झाला. पूर्वीचें रोमँटिक स्वप्न बदललेल्या समाजाच्या वास्तवतेशीं (Reality) विसंगत ठरलें आणि वरच्या वर्गाचा निःपात आणि खालच्या वर्गाचा उदय यांत समाजाचें प्रगतिशील स्वप्न आलें. या समाजाच्या प्रगतिशील स्वप्नाची स्थापना करावयास भांडवलदार वर्गाच्या जीवनांतील घाण, फसवणूक व निर्दयता दाखवणें जरूर होतें. परंतु हें कार्य करावयास रोमँटिक स्वप्नसृष्टि निरुपयोगी होती. त्यासाठी नव्या प्रकारचें वास्तव प्रगतिशील काव्य आणि वास्तवतापूर्ण जीवनाचें चित्रण जरूर होतें. म्हणूनच कादंबरी वाङ्मयांत प्रचंड बदल झाला. वरच्या वर्गाच्या घृणेने तळमळणारे कलावंत निर्माण झाले आणि समाजाचें यथातथ्य चित्रण करावयाचा विडा उचलला. आणि म्हणूनच (Naturalism) चा समाजाचें बाह्य यथातथ्य चित्रण करण्याच्या पद्धतीचा— उदय झाला. बालजक, फ्लॉबेयर, जोला–इत्यादींनी –तें निरनिराळ्या दृष्टिकोणाचे असतां देखील-(बालजक जुन्या सरंजामदारवर्गाचा समर्थक होता आणि जोला हा रिपब्लिकन विचारसरणीचा समर्थक होता.) सर्वांनी भांडवलशाही समाजाचें ओंगळवाणें रूप अत्यंत बारकाईने पुढे मांडलें. ह्या अभिव्यक्ति–प्रकारांना त्यावेळच्या राजकारण करणाऱ्या संस्थांनी कलावंतांवर बळजबरी करून लादलेलें नव्हतें, तर तो अभिव्यक्ति–प्रकार स्वयमेव उदयास आला होता. या प्रकाराशिवाय किंवा या दृष्टीशिवाय तें वाङ्मय अगर तसल्या प्रकारचें काव्य— (इंग्रजी कविता Ramantic काव्यानंतर टेनीसन–स्विनबर्न–रॉसेटीपर्यंत कसबी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

झाली व नंतर तींत आमूल बदल झाला. स्थलाभावास्तव त्याची माहिती देणें अशक्य आहे)—महान् होणें अशक्य होतें. साहित्याच्या निरोग परंपरेची ती निवड होती. या प्रवृत्तींच्या विरुद्ध जुन्या रोमँटिक पद्धतीचा अवलंब फोलकट आणि केवळ कसरती–ठरला असता आणि सामाजिक स्फूर्ति त्यामागे नसल्याने तो रोमान्स निर्जिव नियंत्रणामुळे Naturalism यथातथ्यवास्तव वादाचा–उदय झाला नसून कलेची महान् परंपराच याला कारणीभूत होती. परंतु समाजाच्या वरच्या थराची ती अधोगति का झाली, याचें वर्गविश्लेषण त्या कलावंतांजवळ नव्हतें. समाजांतील विषमतेस कारणीभूत व्यक्तिगत मालमत्ता पद्धतीचा नाश व्हावयास हवा आणि त्यासाठी कामगार-वर्गाच्या क्रांतिकारी नेतृत्वाखाली समस्त दलित जनता या पद्धतीस उलथूं शकेल, हा साम्यवादी सिद्धांत त्यांच्याजवळ नव्हता. वरील प्रकारच्या कलावंतांनंतर समाजांतील वर्गविग्रह अधिक स्पष्ट झाला आणि वाढीस लागला. या वर्गविग्रहाच्या तत्त्वज्ञानाने अखिल जगास हालवून सोडलें. त्याचा परिणाम हिन्दुस्थानवरहि झाला. जगाची समस्त मानवता एका प्रचंड लढ्यांत गुंतली असतां तीच वर्गदृष्टि वाङ्मयांत किंवा कलांत होणें अपरिहार्य होतें. तेव्हा पूर्वीच्या Naturalism ला वर्गदृष्टीची मदत मिळून शास्त्रीय वास्तववादाचा (Scientific Realism) उदय झाला. आधुनिक जीवनाचें सम्यक निरुपण व्हावयास, त्यांतील व्यक्तींचें महत्त्व समजून घेण्यास त्याची वर्गदृष्टि व त्याचें वातावरण (enuironment) लक्षांत घेणें जरूर आहे. दारिद्र्याच्या केवळ बाह्य वास्तवचित्रणाने दलितवर्गाची महत्ता आणि मानवीयता समजणार नाही. त्या वर्गांतील अंतर्शक्ति समजून घेण्यास या शास्त्रीय वास्तववादाशिवाय दुसरें गत्यंतर नाही. ही साहित्यवृत्ति समाजाच्या प्रगतिशील स्वप्नाशी सुसंगत आहे. त्यासाठी दलितवर्गाच्या श्रमांत सहकार हवा. गोर्कीच्या सफलतेचें रहस्य यांतच आहे. मध्यमवर्गीय दलित वर्गाच्या श्रमांत सहकार करूं शकत नाही. परंतु आपल्याच वर्गाची शास्त्रीय दृष्टीने पाहणी तें करूं शकतात आणि त्या वर्गाच्या क्रांतिकारी किंवा प्रतिक्रांतिकारी वृत्तींचे व त्या दृष्टीने त्यांच्या विविध संबंधाचें निरूपण ते करूं शकतात. मध्यवर्गाचें चित्रण करावयाचें झाल्यास मध्यमवर्गीयास कलेच्या इमानाच्या दृष्टीने हा शास्त्रीय समाजवादी वास्तववाद स्वीकारावा लागेल. आणि जनतेच्या क्रांतीचें आवाहन करावयास त्याला समाजाच्या साम्यवादी कल्पनेला सुसंगत असें क्रांतिकारी स्वप्न निर्माण करावें लागेल. यांतून नव्या क्रांतिकारी समाजवादी रोमँटिक वाङ्मयाचा (Revolutionary Romanticism) उदय होतो. या प्रवृत्ति साहित्यिक परंपरेचा शास्त्रीय परिणामच आहेत. वास्तवतेचें सत्य उद्घाटन करावयास लागणारें इमानच कलावंतावर नियंत्रण आणूं शकते. अशा इमानाचा पुरस्कार करणेंच जर कलावंताच्या स्वातंत्र्यावर नियंत्रण असेल, तर कोणत्याहि वाङ्मयीन समीक्षेच्या मापदंडांची चर्चा करणें व्यर्थ ठरेल.

व्यक्तीला तिच्या वातावरणाशिवाय चित्रित केलें असतां तिचें खरें रूप समजणार नाही, तें अर्धसत्य होईल. व्यक्तीला तिच्या वर्गवृत्तीच्या संदर्भांत पाहिलें असतां तिच्या दृष्टिकोणाचें महत्त्व आणि मूळ समजतें. आजच्या कलावंतांनी हा वर्गवादी दृष्टिकोण अंगिकारावा, असें म्हणण्यांत जीवनाशीं सुसंगत असें सत्य सांगण्यांत येतें. निरोगी आणि महान् परंपरेचा आग्रहच ही गोष्ट करावयास लावील.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या शास्त्रीय दृष्टिकोणाचा विरोध करणें हें कितीहि परममंगल कर्तव्य कांहीं लोकांस वाटत असलें तरी साहित्याची जिवंत परंपरा कोणासाठीं थांबत नाही. इमानदार कलावंत याच दृष्टिकोणाचा स्वीकार करतील–करीत आहेत. यांतच कलावंताचें स्वातंत्र्य आहे. नाही तर शोषकवर्गाच्या यंत्रांतील एक सहकारी बनून, त्यांच्याच पैशावर जगून आणि त्याच वर्गातील प्रकाशकांच्या लहरीवर विसंबून व प्रतिक्रियेशीं समेट (Compromise) करून मग कलावंताच्या–म्हणजे स्वतःच्या–स्वातंत्र्याचा प्रचार करणें किती उपहासास्पद आहे, हें सांगावयास नकोच. असें म्हणणें मराठीच्या महान् जनवादी . साहित्य परंपरेचा अपमान आहे. अहंतेने आणि प्रतिक्रियेशी समेट केल्याने अत्यंत प्रतिभाशाली कलावंत कसा वाया जातो, याचें उदाहरण म्हणून महाराष्ट्राचे प्रतिभाशाली कादंबरीकार पु. य. देशपांडे यांच्या ' काळी राणी ' ' नवें जग ' या कादंबऱ्या पाहाव्या. अहंतेच्या आक्रोशाने हीं पुस्तकें हातांतच धरवत नाहीत ! कलासंयमाच्या दृष्टीने आणि आशयाच्या दृष्टीने हीं पुस्तकें किती सदोष आहेत, हें कोणीहि स्पष्ट बोलणारा कबूल करील.

आजच्या समीक्षेचीं मूल्यें कोणतीं, हा विचार करावयाची वेळ आली आहे, यांत संशय नाही. पीटर थीओने यांच्या खालील वाक्यांत वरील दृष्टिकोणाचा सारांश आला आहे:—

" The development of art cannot be conceived as a self sufficient process taking place outside social reality. The question at issue is not ' Wither Art ? – ' but 'Wither Humanity ? ' —

● ● ●

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

Bee यांची अखेर !

★

खंडेराव गोपाळ प्रधान

● कविवर्य Bee यांच्या अखेरच्या दिवसांचें हृदयस्पर्शी वर्णन त्यांचे जामात छिंदवाडा येथील रा. खं. गो. प्रधान यांनी या चिमुकल्या लेखांत केलें आहे. तें Bee यांच्या चाहत्यांस-व सर्वसाधारण काव्यभक्तांसहि—बहुमोल वाटेल.

Bee यांचें घरगुती नांव 'दादासाहेब' असें होतें. त्याच नांवानें लेखांत त्यांचा उल्लेख करण्यांत आला आहे.

* *

कै. दादासाहेबांचा मृत्यु आम्हाला अगदीच अनपेक्षित होता. शेवटच्या क्षणापर्यंत आम्हाला कल्पना नव्हती कीं, दादासाहेब आम्हाला सोडून जातील ! दादासाहेब माझ्यापाशीं जवळ जवळ १४ वर्षें होते. मी त्यांचा भाचा व जावई असें दुहेरी नातें आहे. मी लहानपणापासून त्यांच्या जवळ शिक्षणाकरिता होतों. त्यावेळीं त्यांचें सर्व कुटुंब एकत्र होतें. माझें लग्न ता. १५-२-१९१७ रोजीं कै. दादासाहेब यांची ज्येष्ठ कन्या वत्सला इजशीं झालें. आम्ही दोघेहि एकत्रांत वाढलों असल्यामुळें आमचा विवाह एकमेकांच्या पूर्ण पसंतीनें होता, हें सांगणें नको.

कै. दादासाहेबांची राहणी अगदी साधी होती. त्यांचा व्यासंग फार दांडगा असे. नोकरीवर असतांना ते रात्रीं २-२॥ पर्यंत आपल्या खोलींत वाचीत बसत असत. ते फार मितभाषणी असून आपणाकरिता दुसऱ्यास शक्य तितका त्रास होऊं नये, यावद्दल फार जपत असत व आपलीं कामें शक्य तितकीं स्वतःच करीत असत. त्यांची शरीरकाठी तेजःपुंज व शेवटपर्यंत ठीक होती. मोतीबिंदूमुळें दृष्टि अधु झाली होती व अगदी जवळ आल्याशिवाय त्यांना दिसत नव्हतें. याशिवाय शरीरांत कोणत्याहि प्रकारचा बिघाड नव्हता.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माझी पत्नी व आई— म्हणजे दादासाहेबांची सख्खी धाकटी बहीण त्यांच्या प्रकृतीची शक्य तेवढी काळजी घेत असत व त्यांच्या खाण्यापिण्यासंबंधीं फार जपत असत. दादासाहेबांना सकाळीं १०।। वाजतां व संध्याकाळीं ६–६।। वाजतां जेवणाची सवय होती. त्यांच्या त्या सवयी माझ्या पत्नीने अत्यंत तत्परतेने शेवटपर्यंत सांभाळल्या होत्या.

माझा तिसरा मुलगा चि. पद्माकर हा दादासाहेबांचा फार आवडता होता. त्याचें निजणें बसणें, अभ्यास करणें–वगैरे सर्व त्यांच्या जवळ असे. ते स्वत: त्याला शिकवीत असत व त्याच्या प्रकृतीची सर्वतोपरी काळजी घेत असत. त्याचा जन्म अकोला येथे १८-१-१९३५ रोजीं झाला. तो लहानपणापासून त्यांच्या अंगावर असून त्याला शिकविण्यांत त्यांचा बराच वेळ जात असे. तो इंग्रजी ४ थ्या यत्तेंत आहे. तो त्यांचीं सर्व कामें मोठ्या आस्थेने करीत असे.

कै. दादासाहेबांच्या मृत्यूपूर्वीची हकीकत बरीच कुतूहल उत्पन्न करणारी असल्यामुळे थोडक्यांत देत आहे. बुधवार, तारीख २७–८–४७ रोजीं, दादासाहेबांनी नेहमीप्रमाणें हजामत, आंघोळ वगैरे केली. त्यांना निजण्याबसण्यास दिलेली स्वतंत्र खोली माडीवर असल्यामुळे हीं सर्व कृत्यें व भोजन करण्यास ते खाली येत असत. बुधवारीं कोणत्याहि प्रकारचा बिघाड त्यांच्या प्रकृतींत नव्हता. गुरुवार ता. २८-८-४७ रोजीं थोडथोडे चक्कर येतात म्हणून सांगितल्यावरून डॉक्टरांस बोलाविलें. त्यांनी प्रकृति तपासून कांही विशेष बिघाड नसल्याचें सांगितलें व चक्कर अशक्तपणामुळे असल्याचें सांगितलें. गुरुवारीं त्यांना राहून राहून ३–४ तासांच्या अंतराने चक्कर येत असत व ८–१० मिनिटें राहून पुन्हा पूर्ववत् वाटत असे. ते निजून नव्हते. नेहमीप्रमाणें हिंडत फिरत होते. गुरुवारीं रात्रीं त्यांना चांगलीशी झोप आली नाही. राहून राहून चक्कर येत असत.

शुक्रवारीं सकाळीं मीं विचारलें की, "श्वास कोंडल्यासारखा वाटतो म्हणजे काय होतें?" त्यावेळीं दादासाहेब, तक्क्याला टेकून बसले होते व त्यांना हिंदुस्थान टाइम्स् वाचून दाखविल्यावर वरील प्रश्न केला होता व पुढें असेंहि म्हणालों की, प्राणायाम करण्याच्या वेळीं जसें कोंडल्याप्रमाणें वाटतें तसें होतें काय? त्यावर दादासाहेब म्हणाले, "छे, छे, तसें बिलकूल वाटत नाही. मनुष्याला ऊर्ध्वश्वास लागल्यानंतर त्याची एक एक नाडी तुटतांना जसें वाटतें, त्याप्रमाणें वाटतें. परंतु जागृतावस्थेंत हिंडत फिरत असतांना या स्थितीचा अनुभव घेण्यांत फारच मौज आहे. अशी स्थिती ७-८ मिनिटें टिकतें व पुन्हा पूर्ववत् वाटतें." त्यावर मी म्हणालों, "आपण योगाभ्यास केला असल्यामुळे शरीरांतील बारीकसारीक हालचाली आपणांस कळतात" हें भाषण दादासाहेब नेहमीप्रमाणें तक्क्याला टेकून बसले असतांना झालें.

तसेंच पंजाबांतील भीषण हत्याकांड वाचून दाखविल्यानंतर त्यांना सांगितलें की, "या पुढें तुम्ही मला वर्तमानपत्र वाचून दाखवूं नका! माझ्या नजरेसमोर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९४८
मार्च

पंजाबांत मुसलमानांनी केलेली कत्तल सारखी उभी राहते व त्यामुळे मला अत्यंत खेद होतो ! रात्री स्वप्नांत देखील जाळपोळ व कत्तल दिसते. याला सर्वस्वी जबाबदार जीना आहे ! तो स्वप्नांत दृष्टीसमोर नाचतो व त्याच्या आक्राळविक्राळ स्वरूपाचें फार भय वाटतें ! ''

यानंतर आमचें दुसऱ्या विषयावर बोलणें झालें. दादासाहेबांच्या प्रकृतींत काळजी करण्यासारखें कांहीच वाटत नव्हतें व तसें त्यांनी कांहीहि दर्शविलें नाहीं, या नंतर सायंकाळीं ६॥ च्या सुमारास त्यांनी नेहमीप्रमाणे भात, आमसुलाचें सार, भाजी, चटणी—वगैरे भोजन केलें. रात्रीं १० च्या सुमारास त्यांची मच्छरदाणी वगैरे लावून दिली. त्यांनी स्वतः चि. पद्माकराचा बिछाना वगैरे नीट घातला आहे किंवा नाहीं, हे पाहिलें व औषधाचा 'डोज' घेतला. थोड्या वेळाने मीं त्यांना विचारलें कीं, "सूतशेखराची मात्रा देऊं काय ?" ते म्हणाले, "एकसारखीं गरम औषधें घेतलीं, तर म्हातारपणामुळे जर्जर झालेल्या शरीराला सोसतील काय ? तरी मला आता मात्रा नको." त्यानंतर मी आपल्या खोलींत निजण्याकरिता गेलों.

रात्रीं १२॥ च्या सुमारास माझी पत्नी जागी झाली व दादासाहेबांजवळ गेली. ते जागेच होते. तेव्हा तिने त्यांना "दूध देऊं काय ?" म्हणून विचारलें व त्यांनीहि देण्यास सांगितलें. त्यावर तिने स्टोव्ह पेटवून दूध ऊन केलें व सरासरी १। वाजण्याच्या सुमारास त्यांना दिलें. नंतर ते लघ्वीहून आले व स्वतः हाताने बर्शीनून बसून दूध घेतलें. उसें उंच होतें, तें त्यांनी जरा खाली करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें माझ्या आईनें व पत्नीनें त्यांना पाहिजे तितकें उंच उसें करून दिलें व ते निजले. निजल्यानंतर ५ मिनिटांनी "जीव घाबरतो व चक्कर येतो !" म्हणून म्हणाले. मी लगेच त्यांच्या जवळ आलों. मला वाटलें, त्यांना नेहमीप्रमाणें चक्कर आला आहे. म्हणून मीं त्यांचें डोकें आपल्या छातीवर घेऊन त्यांची छाती हळूं हळूं चोळूं लागलों वं पत्नीला छाती शेकण्याकरिता शेगडी पेटवून आणण्यास सांगितलें. अशा स्थितींत ४-५ मिनिटें गेल्यानंतर दादासाहेब माझ्या अंगावरून आपणहून उठून बसले. मीं त्यांना म्हटलें कीं, "तुम्ही माझ्या छातीवरच डोकें ठेवून स्वस्थ पडा, म्हणजे बरें वाटेल. त्या प्रमाणें त्यांनी माझ्या छातीवर डोकें टेकलें व लगेच गप्प झालें ! मीं नाडीला व छातीला हात लावून पाहिल्यावर खरी स्थिति कळून आली ! झालें, या थोर पुरुषाचा आत्मा नश्वर देहाला सोडून गेला ! यावेळीं, १ वाजून ४५ मिनिटें झालीं होतीं !

तोंडावर अपूर्व शांति झळकत होती. सकाळीं भेटीकरिता आलेली मंडळी "दादांना गाढ झोप लागली आहे—तोंडावर मृत्युकळा बिलकूल नाही"—वगैरे म्हणाली. स्मशानयात्रेस निघण्यापूर्वी काढलेले फोटो 'एन्लार्ज' करण्याकरिता दिले आहेत.

मुंबई—पुण्याकडील बऱ्याचशा वर्तमानपत्रांत व मासिकांत त्यांच्यावर लेख
९९ आले आहेत. नागपूरकडील पत्रांनी त्यांच्या मृत्यूची बातमी छापली नाहीं, असें

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दिसतें ! येथील महाराष्ट्र समाजानें केलेला दुखवट्याचा ठराव 'महाराष्ट्रा'कडे पाठविला होता. तो छापल्याचें दिसत नाही ! असो.

श्रीयुत बापुजी अणे यांनी मागे 'आनंदगीता'च्या प्रस्तावनेंत दादासाहेब यांच्या काव्यावर प्रतिकूल टीका केली होती. ती गोष्ट अणे यांना जाचत होती. त्यांनी ता. १७-३-४२ रोजीं पत्र पाठवून ती टीका निष्कारण कठोर, कटु व अविचारानें केली होती, म्हणून कबुली दिली व त्याबद्दल क्षमा करण्यास दादासाहेबांस विनंती केली होती ! त्यांनी स्पष्ट शब्दांत कबुली दिली आहे कीं, 'Bee' हे श्रेष्ठ कवि आहेत व त्यांची श्रेष्ठता त्यांना विद्यार्थिदशेंतच कळली होती ! वरील पत्राला दादासाहेबांनी लगेच जबाब दिला होता. त्यांच्या कवितेवर झालेल्या निष्कारण टीकेसंबंधीं त्यांनी केव्हाहि पर्वा केली नाही व त्या टीकेला उत्तरहि दिलें नाही ! "अर्थ न समजून केलेल्या टीकेला उत्तर न देणें हेंच योग्य," असें त्यांचें मत असे.

कै. दादासाहेबांचा एकुलता एक मुलगा—चि. दत्तात्रेय नारायण गुप्ते (वय ४१ वर्षे) मुंबईस असतो. त्यांची उत्तरक्रिया नासिक येथे त्यांचे धाकटे बंधु श्री. गजानन महाराज यांच्या गंगाकाठच्या समाधीजवळ त्यांच्या मुलाच्या हस्तें यथासांग केली. मी, त्यांचे दुसरे दोन जावई व इतर मंडळी नासिकला जमलों होतों.

कै. दादासाहेबांनी इंग्रजीमध्ये योग, आसनें, समाधि—वगैरेवर फारच उत्तम टिपणें केलीं होतीं. परंतु दुर्दैवानें त्यांनी तीं टिपणें २-२॥ वर्षांपूर्वी माझ्या गैरहजेरींत जाळून टाकलीं ! दुसरे अर्धेमुर्धे लिहिलेले लेख किंवा काव्यें त्यांच्याजवळ कांहीच नव्हतीं ! त्यांनी स्वतःच आपल्या हातानें तीं सर्व जाळून टाकलीं !

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जीवन–लहरी

★

१

सदनीं माझ्या तिमिरीं
ठेवा पाउल अपुलें
उडवा अन् त्याच क्षणीं
देहाचीं या शकलें !
रातकिड्यापरि जगलों
श्रमल्याविन मी दमलों !
तमभय जीवन पावो
तेजोमय अंत तरी !

२

हर्षानें मी हसतां
स्मरण तुझें ना केलें
सम्राटा ! म्हणुनी का
फिरविशी तूं मुख अपुलें ?
मानवनीती परि ही
अनुसरशी प्रभु तूंही !
थोरपणाची तुझिया
साक्ष कुठे मग मिळणें ?

३

वठला हा वृक्ष अता
वैभव पडलें गळुनी
वेली ना भवताली
आशा गेल्या जळुनी
छायेसाठी पथिका
घुटमळशी येथे का ?
शल्य मनाचें जागें
करिशी का, फिर मागें !

४

दुबळ्यांवर निशिदिन का
आग अशी पाखडतां ?
गर्वोद्धत त्यांवर जा
कोसळुं द्या निर्दयता !
मार्तंडें काजळलीं
मत्त करीं चुरगळलीं
हीं सुमनें प्रीतीनें
खुलवा, फुलवा, जगवा !

५

स्वप्नांची रास सखी
घेउनिया हातीं तूं
येशि कशाला दारीं
काय तरी तव हेतू ?
मधु स्वप्नांचा तर मी
होउन राही स्वामी !
कळल्यावर हें आता
फिराशिल ना माघारी ?

—मनोहर शिरवाडकर.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हृदयाची साक्ष

मूळ लेखक—एडगर ॲलन पो.
अनुवादक—द. चिं. सोमण

[लेखक परिचय—एडगर ॲलन पो (१८०९-१८४९) ह्या अमेरिकेंतील लेखकाच्या कथा वाचकाला एका निराळ्याच जगांत नेतात. मरणोत्तर अस्तित्वावर पोचा दृढ विश्वास होता आणि "पोच्या कथांत जीवनवाहिनीच्या, मृत्युमुखांत पडणाऱ्या उडीचें वर्णन वा त्या स्थळीं घडणाऱ्या घटना हीं आढळतात!" असें एक फ्रेंच टीकाकार म्हणतो. पुढील कथा पोच्या कथा-विषयांची व लेखन पद्धतीची थोडी फार कल्पना वाचकांस करून देईल.

मी घाबरलों होतों, हें खरें आहे! आणि अतिशयच घाबरलों होतों, हें त्याहूनहि खरें आहे! पण तेवढ्यावरून तुम्ही मला वेडा म्हणाल? माझ्या मेंदूंत विकृति झालेली आहे, असें ठरवाल? मी आजारी होतों, पण त्यामुळे माझा मेंदु बिघडला नाही, उलट सर्व ज्ञानेंद्रियें तिखट झालीं; विशेषतः श्रवणशक्ति!! पृथ्वीवरचें सर्व मला ऐकायला येणें शक्य आहेच, तथापि स्वर्गांतलें सुद्धा स्पष्ट ऐकूं येतें मला! आणि ह्यामुळे मी वेडा कसा ठरतों, तुम्हीच सांगा! यमपुरींतल्याहि किंकाळ्या मला ऐकूं येतात, म्हणून मी वेडा? आश्चर्य आहे! वाद कशाला पण? आतां जें मी तुम्हांला सांगणार आहे, तें किती पद्धतशीर सांगतों, बघा! सारें ऐकून घ्या आणि मग स्वतःलाच विचारा, "खरंच हा वेडा आहे का? का नाही?"

ती कल्पना प्रथम माझ्या डोक्यांत कशी शिरली, कुणास ठाऊक. परंतु एकदा तिने मेंदू व्यापून टाकल्यावर मात्र रात्रंदिवस ती मला चैन पडूं देईना! त्या खुनांत उद्देश नव्हता, तो म्हातारा मला आवडे, कुठल्याहि मनोविकारप्राबल्याने माझ्या हातून तो खून घडला नाही. तरी पण मी त्याचा खून अखेर केलाच! बिचाऱ्याने मला कधीहि फसवलें नव्हतें, माझा अपमान केला नव्हता··· कांही, कांही नव्हतें!

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्याच्याजवळ पैसा होता, पण तो मला कधीच हवासा वाटला नाही. मला वाटतें-तुम्हांलाच म्हणून सांगतों हं !— की, त्याच्या त्या एका डोळ्यामुळे मी खून केला त्याचा ! कायमचा मिटवून टाकला तो डोळा ! अगदी फिक्कट निळसर होता त्याचा डोळा आणि त्यावर कांहीतरी पारदर्शक बसविल्यासारखें वाटे ! गिधाडासारखा तो बघत असे व डोळ्याची उघडझापहि गिधाडाच्या डोळ्यांसारखीच करी ! जेव्हा जेव्हा तो म्हातारा माझ्याकडे त्या डोळ्याने पाही, तेव्हा तेव्हा माझें रक्त एकदम गोठे ! त्रासून गेलों होतों मी अगदी ! स्वतःला नकळतच मी त्या म्हाताऱ्याचा, त्या अमंगल डोळयाच्या मालकाचा, खून करावयचा निश्चय करीत होतों ! अखेर तो निश्चय करून संपला, म्हणजे त्याचा खून करायचे मी निश्चित केलें आणि ठरवलें की, ती तापदायक गोष्ट नामशेष करायचीच !

आतां मुद्दा असा की, तुम्ही मला वेडा म्हणता परंतु वेड्याला कांही कळत नाही हें विसरण्याचा वेडेपणा नेमका तुम्हीच करता ! गंमत नाही का ही ? मी सांगतों, तो खून मी किती धूर्तपणाने, किती दूरदृष्टिपूर्वक केला, हें जर तुम्ही बघितलें असतें, तर आश्चर्यच वाटलें असतें तुम्हांला ! मी सांगतों, खून करण्यापूर्वीचा सारा आठवडा मी त्या म्हाताऱ्याशीं अत्यंत प्रेमळपणाने वागण्यांत घालवला. आणि त्या आठवडाभर रोज रात्रीं बारा वाजतां त्या सद्‍गृहस्थाच्या—म्हणजे त्या म्हाताऱ्याच्या—खोलीचें दार जेव्हा जेव्हा उघडलें, तेव्हा तेव्हा इतक्या सावधगिरीनें हालचाल केली की, त्याला पत्तादेखील लागला नाही. दारांतून माझें मस्तक आंत जाईल इतकें तें उघडलें की, माझ्या हातांतला कंदील अगोदरच आत पुढे करीत असे ! त्या कंदीलाला तीन बाजूंनी होता एक पत्रा कायम ठोकलेला, त्यामुळे त्या बाजूंकडून उजेड बाहेर येण्याचा संभवच नव्हता. कंदीलाची चौथी बाजूहि कांही तुम्हांला वाटतें तशी मोकळी नव्हती; तिकडे होती झडप ! उजेड हवा असला की, झडप वर करावी, नको असला की, ती बंद करावी ! खट् झडप लागली की, गुडुप् काळोख ! कंदीलामागून खोलींत प्रवेश व्हायचा माझा ! तुम्ही तिथे हजर असतां तर कदाचित् त्या सावधपणाला हंसायलाहि कमी केलें नसतें ! दरवाजा उघडून माझें डोकें आंत पूर्ण घुसवायला तब्बल तास लागायचा ! हळू हळू सर्व चालायचें. मग आणखी हळू मी दिव्याची झडप उघडून प्रकाशाची तिरीप त्या डोळ्यावर पाडायचा ! फार जपून उघडावी लागे ती झडप नाही तर ती करऽ वाजायची ! मी विचारतों, विकृत मेंदूचा मनुष्य इतकी सावधगिरी घेऊं शकेल का ? बोला ! सतत सात रात्रीं मी हें केलें आणि तेंहि अगदी बरोबर बारा वाजतां ! रोज रात्रीं मी तिरीप पाडून पाहिलें, पण तो डोळा मिटलेलाच दिसायचा ! डोळा उघडा असल्याशिवाय मी काय करूं शकणार ? नाही का ? म्हाताऱ्यावर माझा राग नव्हताच; तो डोळा मात्र चीड आणायचा ! मग तो उघडा नको ?— रोज उजाडलें की, मी आपण होऊन त्या म्हाताऱ्याच्या खोलींत जायचा आणि अगदी हंसतमुखाने म्हणायचा, "काय ? कशी काय लागली होती रात्रीं झोप ?" आता तुम्हांला कळेलच की, म्हाताऱ्याला माझा किंचित्‌हि संशय येणें अशक्य होतें ! रोज रात्रीं बारा वाजतां अचूक त्याच्या त्या गिधाडासारख्या डोळ्यावर मी तिरीप पाडीत असेन, हें त्याला कळेलच कसें ? नाही का ?—

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आठव्या रात्रीं दार उघडतांना मी खूपच सावधगिरी घेतली. माझ्या हातापेक्षा घड्याळाचा मिनिटें दाखविणारा छोटा हात ज्यास्त जलद चालत होता. मी किती शहाणा, धूर्त, बुद्धिप्रधान आहे, हें आठव्या रात्रीं मला पूर्णपणें कळलें ! विजयाचा आनंद माझ्यांत मावत नव्हता ! मी हळू, अगदीं हळूच, दार उघडत होतों आणि म्हातारा बेसावधपणें गाढ झोपला होता. कारण मी बुद्धिमान् असल्यामुळे अखेरीं जिंकणें मला शक्य झालें होतें ! माझें मलाच आश्चर्य वाटलें त्या धूर्तपणाचें व का कुणास ठाऊक, पण मी नकळतच खुदकन् हासलों ! मला वाटतें, म्हाताऱ्याने तो हसण्याचा आवाज ऐकला. कारण दचकून त्याने कांहीं तरी हालचाल केली, हें त्याचा बिछाना वाजल्यामुळे मला तावडतोब कळलें ! तेवढ्याने मी माघार घेतली असेन, असें तुम्हांला वाटेल, पण नाही ! खोलींत खूप अंधार होता—चोरांच्या भीतीने म्हातारा खिडक्या लावून घ्यायचा !—मग उघडलेला दरवाजा त्याला कसा दिसणार ! नाही का ? हा मुद्दा तुमच्या नव्हता ध्यानांत आला ! माझ्या क्षणांत लक्ष्यांत आलें तें.!!

डोकें आंत झुकवून मी दिव्याची झडप उघडायला लागलों, परंतु कशी कुणास ठाऊक, ती निसटली आणि आवाज झाला 'खट्' !

म्हातारा अंथरुणांत उठून बसला व ओरडला, "कोण आहे ?"

मी निश्चल राहिलों आणि जीभ दातांनीं दाबून धरली ! पुन्हा बिछाना वाजला नाही, त्यामुळे तो तसाच बसलेला होता, हें मीं ओळखलें !

थोड्याच वेळांत मला कण्हल्याचा आवाज ऐकूं आला. मृत्यूच्या जबड्यांत शिरतांना मनुष्य जसा कण्हतो, तसें कण्हणें होतें तें ! अस्पष्ट आणि किंचित् घुमणारें ! म्हाताऱ्याच्या आत्म्याचें कण्हणें होतें तें; त्याचा आत्मा मरणाच्या दारांत घाबरला होता ! तें कण्हणें मला परिचित आहे ! कितीतरी वेळां रात्रीं मी तसाच कण्हतों !

म्हातारा भीतीने गांगरला होता; आपल्याला भास झाला असावा, 'वाऱ्याचा आवाज असेल तो ! एखादा उंदीरसुद्धा असेल' ! अशी आपल्या मनाची समजूत तो घालीत असावा. पण मरण त्याच्याकडे येत होतें, हें त्याच्या आत्म्याने ओळखलें होतें. येणाऱ्या मृत्यूच्या छायेने त्याचा आत्मा म्हणा, जीव म्हणा, वेढून टाकला होता. तो देह टाकावा लागणार, हें जाणून आत्मा :... ... जाऊं द्या !

बराच वेळ मीहि हालचाल केली नाही आणि शेवटी ठरवलें की, प्रकाशाची तिरीप हळूच पाडून पाह्यची ! तसेंच केलें मी ! कोळ्याच्या जाळ्यांतील धाग्यासारखा अगदी बारीक एकच किरण दिव्यांतून निघाला आणि त्या डोळ्यावर जाऊन पडला.

त्या गिधाडाच्या डोळ्यासारख्या डोळ्यावर किरण पडला आणि ......आणि तो डोळा उघडा होता, हें मला दिसलें. संताप झाला माझा ! तोच तो डोळा ! तोच ! स्पष्ट दिसला तो मला ! म्हाताऱ्याचा चेहरा दिसत नव्हता मला; काळोखं

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होता सगळीकडे ! डोळा फक्त दिसला; कुठल्या तरी पारदर्शक आवरणाखालीं असल्यासारखा दिसणारा तोच तो फिक्कट निळा डोळा ! !

आणि, तुम्हांला मी सांगितलेंच की, तुम्ही मला वेडा ठरवा कीं, शहाणा ठरवा. माझीं ज्ञानेंद्रियें अगदी तिखट झालीं होतीं. श्रवणशक्ति तर कमालच तिखट ! आणि, आता सांगतों की, कापसाचें एखादें घड्याळ गुंडाळून ठेवलें, तर त्याची टिक्‌टिक् जशी ऐकूं येईल, तशीच त्या अंथरुणावरील म्हाताऱ्याची हृदयाची टिक् टिक् मला दरवाज्याशीं ऐकूं यायला लागली. टिक् टिक् नको असेल, तर धप् धप् म्हणा ! धप् ! धप् ! धप् ! —ही हृदयाची धड धड मला ओळखतां येतें. माझें हृदयहि रात्रीं तसेंच धडधडतें ! टिक्, टिक्, धप्, धप्! मला राग आवरेना. पडघमाचा आवाज ऐकून सैनिकाला कसा आवेश येतो, तसेंच कांहीसें मला झालें !

तरीहि मी निश्चल होतों, श्वासहि रोधून धरला होता. हातांतील दिवा तसाच स्थिर ठेवला होता मी ! तो किरण डोळा तसाच पोखरीत होता. पण ती म्हाताऱ्याच्या हृदयाची धपधप मात्र थांबेना ! उलट वाढायला लागली ती ! धप-धप-धप… जलद आणि अधिक स्पष्टच ! प्रत्येक क्षणाला वाढत होती ती, प्रत्येक क्षणाला हं ! खूप घाबरला होता म्हातारा ! स्पष्टच होतें तें ! आणि मीहि तुम्हांला सांगितलेंच की, मी देखील भीतीनें बेचैन झालों होतों ! अजून सुद्धा तीच भीति कायम आहे. त्या जुनाट घरांतील ती वेळ व तशी ती शांतता आणि ती हृदयाची धडधड ! बापरे ! आठवण झाली तरी अजुन कापरें भरतें. खूप घाबरलों मी ! धप् धप् धप् …आता खूप जलद व अगदीं स्पष्ट ! म्हाताऱ्याचें हृदय फुटणार, असेंच वाटायला लागलें मला ! आणि, समजा ती धडधड एखाद्या शेजाऱ्याच्या कानीं पडली असती तर ! नवीनच प्रश्न उपस्थित झाला तो ! काय वाजतें आहे बघायला शेजारी–पाजारी यायचे आणि साराच कारभार आटपायचा ! आता तें हृदय थांबविणें भागच होतें. एकदा किंचाळून मी दिव्याची झडप पूर्ण उघडली आणि दरवाजा सताड उघडून खोलींत घुसलों. म्हाताऱ्यानें एक किंकाळी फोडली; फक्त एकच, हं! दुसऱ्याच क्षणीं मी त्याला बिछान्यावरून खालीं ओढलें आणि त्याचा तो झोपायचा पलंग वरील गादीसकट त्याच्यावर उलटवला ! खूप अवजड होता तो पलंग ! येथपर्यंत सारें सुरळीत झालेलें पाहून मी एकदा खुदकन् हंसून घेतलें ! ती हृदयाची टिक्‌टिक् म्हणा, धप्‌धप् म्हणा, मात्र बराच वेळ चालूंच होती. पण आता बरीचशी अस्पष्ट झाली होती ती, भिंतीपलीकडे तो धप्‌धप् आवाज ऐकू जाणें अशक्य होतें. थोड्या वेळाने ती धप्‌धप्‌हि थांबली व सगळीकडे छान शांत झालें. मेला होता म्हातारा !! बिचारा म्हातारा ! मी पलंग उभा केला, बिछाना गुंडाळला आणि म्हाताऱ्याच्या हृदयावर कान ठेवला. छे! टिक् नाही की धप् नाही ! दगड झाला होता म्हातारा ! गार, गार, दगड ! नाडी थांबली होती आणि माझा वैरी तो अमंगल !…अशुभ !…अभद्र डोळा कायमचा मिटला होता, फिक्कट निळा डोळा ! गिधाडाच्या डोळ्याची आठवण व्हायची नाही कां ? आता कसा साफ कायमचा मिटवून टाकला होता मी ! !

माझ्या मेंदूंत विकृति आहे, असें तुम्हांला अजूनहि वाटत असेल तर तें मत तुम्हांला बदलावें लागेल ! कारण ? कारण तें प्रेत बेपत्ता करतांना मी जी चातुरी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दाखविली, तिचा खुलासा कसा करणार तुम्ही? मला वेडा ठरवून? हं-! मी सांगतों—तें प्रेत···त्या प्रेतावर करवत घालावी लागली मला, पण रक्ताचा एक थेंब पडला नाही जमिनीवर! एका पिपांत साठलें म्हाताऱ्याचें रक्त आणि अवयव झाले अलग! मौज आहे की नाही? रक्त म्हणजे जीवन! तें अलग काढलें की, अवयव सुटे होणारच! कारण जीवन म्हणजे चैतन्य म्हणजेच देह! अर्थात् देह म्हणजे आत्मा, हें आहे म्हटलें तर आहे, नाही म्हटलें तर नाही!··· जाऊ द्या तें!

म्हाताऱ्याच्या खोलीची जमीन होती लाकडी फळ्यांची! रात्र पळत होती, पण सफाईने झटपट मी सारें अटोपलें! दोनचार फळकटें जमिनींतून काढलीं, त्या खड्ड्यांत ते अवयव भरले आणि पुन्हां फळकटें बसवून जमीन होती तशी केली! म्हातारा होता की नव्हता! पहाटे चार वाजायला आले होते, बाहेर अंधारच होता आणि सर्व संपलें होतें! समाधानाने मी टाळी वाजवली!

इतक्यांत बाहेरचा दरवाजा कुणीसा ठोठावला! पळत हसत हसतच मी दरवाज्याकडे गेलों! मला भीती वाटायचें कारणच नव्हतें आता! तिघेजण दाराबाहेर उभे होते! सुस्वागत केलें मीं त्यांचें! पोलिस खात्यांतले होते ते! एका शेजाऱ्याने किंकाळी ऐकली व पोलिस खात्यांत कळविलें! आणि हे तिघे चौकशी करायला आले होते! त्यांनींच हें सारें सांगितलें! हसत होतों मी तें ऐकतांना! मी सारें ऐकून घेतलें व म्हटलें—

" या, बोलूं आपण ! "

दोन वाक्यांतच मी सारा खुलासा केला. मी म्हटलें, " स्वप्नांत भीतीने मी किंचाळलों! म्हातारा गेला आहे प्रवासाला! " खलास! घरभर हिंडवलें मीं त्या तिघांना आणि सारखा सांगत होतो कीं, नीट शोधून पहा सारें, मग शंका नको! म्हाताऱ्याच्या खोलींतहि नेलें त्यांना मग! त्याचे पैसे दाखविले त्यांना! मुद्दाम बाहेरून खुर्च्या आणल्या, त्या खोलींत आणि म्हटलें,

" बसा, विश्रांति तर घ्या! ह्या शोधाशोधींत थकला असाल! "

आणि, मी कुठे बसलों ठाऊक आहे? म्हातारा जिथें जमिनींत होता, त्या जागेवर खुर्ची ठेवून! विजयामुळे माझा आत्मविश्वास फारच वाढला होता!

त्या पोलिस अधिकाऱ्यांचें पूर्ण समाधान झालें होतें! मी वागलोंच तसा! ते बसून गप्पा मारीत होते व मी मधून मधून विनोद करून त्यांना हसवीत होतों—पण एकाएकी काय झालें कुणास ठाऊक! ते केव्हा जातील, असें वाटायला लागलें एकदम व माझा चेहरा पांढराफट्टक होत चालला आहे, असेंच सांगायला लागलें मन. डोकें ठणकायला लागलें व कानांत आवाज व्हायला लागला! त्यांच्या गप्पा चालूंच होत्या! माझ्या कानांतला आवाज वाढायला लागला. कसली तरी गूढ भीति वाटायला लागली व ती कांही केल्या मनांतून काढतां येईना! उलट वाढायला लागली आणि ... ... आणि अखेर चटकन् माझ्या डोक्यांत प्रकाश पडला! तो आवाज माझ्या कानांत होत नव्हता, बाहेरून कानांत घुसत होता!

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माझा चेहरा निस्तेज होत होता, ह्यांत शंकाच नव्हती. भेदरून गेल्यामुळे भीतिवर उपाय म्हणून आवाज चढवून मी बडबडायला लागलों पण त्याच प्रमाणांत तो आवाजहि वाढला. माझा उपाय चालेना.- एखादें घड्याळ कापसांत गुंडाळून ठेवल्यावर जसा त्याचा आवाज टक् टक्, टिक् टिक् असा अस्पष्ट येतो, तसाच पण जलद व जरा ज्यास्त स्पष्ट असा आवाज होता तो! भीतीने मला कापरें भरलें व दम कोंडल्यासारखा झाला. पण त्या तिघा अधिकाऱ्यांना कसलीच दाद नव्हती! मी उठून उभा राहिलों व अधिकच बडबडायला सुरवात केली. क्षुल्लक कारणांवरून भांडायलाहि लागलों, पण तो आवाज थांबेना! का जात नव्हते ते तिघे? खोलींत येरझारा घालायला लागलों मी! त्या तिघांकडे पाहिलें की, रागाने मी वेडा झाल्या-सारखा होई! कांही सुचेना! अपशब्द तोंडांतून निघायला लागले पण त्या साऱ्या अकांडतांडवांतून तो आवाज नेमका कनांत शिरे! वाढायलाच लागला उलट तो! धप् धप् धप्! मी खुर्ची उचलून भिंतीवर फेकली, मोठा आवाज झाला. पण त्याच्याहि पेक्षां उंच आवाजांत तें धप् धप् धप् सुरू झालें! ते तिघे त्यांच्या गप्पांतच अजून रंगलेले होते. त्यांना तें धप् धप् ऐकूं येत नव्हतें, असें कसें म्हणतां येईल? नक्की त्यांनाहि तें ऐकूं येत होतें! त्यांना खास संशय आला होता आणि ते मला फसवीत होते. शंकाच नव्हती त्यांत! मला तें सारें असह्य झालें! तो आवाज, त्यांच्या गप्पा, त्यांचें तें खोटें खिदळणें... खूप ओरडावेंसें वाटायला लागलें मला! आवाज चढतच होता तो...धप्!...धप्!...धप्!

" नीच मनुष्यांनो! मला का निष्कारण फसवतां? हलकट आहां तुम्ही! लफंगे!! मी फसणारा मनुष्य नव्हे! मी माझा गुन्हा कबूल करतों पण हें नाटक थांबवा! बंद करा हा तमाशा!! गुन्हा कबूल आहे मला! हा इथे ह्या फळ्यां-खालीं प्रेत आहे त्या म्हाताऱ्याचें! आणि, हा धप् धप् आवाज येतो आहे, हा त्याच्या हृदयाचा आहे–त्याचें हृदय माझ्या विरुद्ध साक्ष देतें आहे, ऐका ना··· ··· धप्प्! धप्प्! धप्प्! "

— मी किंचाळलों!!

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ती पहिली गाठ—

वाटेवर त्या रोज फिरावे, विचार हे भोळे
व्हावी एकच गाठ, मिळावे डोळ्यांना डोळे !

अखेर झाली गाठ, जाहली कांहितरी भाषा
भेटिंत पहिल्या अंकुरल्या अन् बळावल्या आशा !

आकांक्षांचीं क्षितिजें भरभर मनामधे फुललीं
इंद्रधनुष्यें भविष्यस्वप्नांचीं त्यावर खुललीं !

जीवनवसनीं सहवासाचा भरला जो रंग
अल्प दिनांनी विरून गेला अन् सुटला संग !

नित्याचें हें अंतर आता, खंत कशी मानूं ?
जीवनांतली घोर व्यंजना निंदूं वा वानूं ?

उदयिं भानुने गालिं उषेच्या गुलाब फुलवावे—
शशिने तेजोकर रजनींच्या कचांत फिरवावे—

वृक्ष-भुजांनी लतेस कोमल आलिंगन द्यावें—
रत्नेशाने अपुल्या हृदयीं सरितेला घ्यावें—

कितीक असलीं निसर्गामधे दृश्यें दिसणार ?
घडावयाचे घडतिल प्रीतीचे साक्षात्कार !

असुया यांची मुळी न वाटे, विशाद ना वाटे
स्वाभाविक पण कधी कधी या मनांत हें येतें—

अशाश्वताची जिनें दाविली पांथांना वाट
नको व्हायला होती अपुली ती पहिली गाठ !

—अनन्त आठले

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठी नाट्यांतील विनोद–विकास

मोरेश्वर दत्तात्रय ब्रम्हे
एम्. ए., एल् एल्.बी.

● अमळनेरचे वकील रा. ब्रम्हे हे उदयोन्मुख नाटककार असून त्यांचें 'आश्रित' नाटक विख्यात 'नाट्यनिकेतन' च्या रंगभूमीवर लौकरच येत आहे. ब्रम्हे हे मराठी नाटकांतील विनोदावर एक महत्त्वपूर्ण प्रबंध लिहीत आहेत. त्यांचा हा विनोदविकासावरील लेख वाचकांस खचित आवडेल.

—पूर्वार्ध

● ● ●

नाटकाच्या पहिल्या अमदानींत जवळ जवळ ४० वर्षे स्वतंत्र सामाजिक नाटकें अशीं फारशीं सापडतच नाहीत. इंग्रजी अगर संस्कृत नाटकांचीं भाषांतरें अगर अनुवादच फार सापडतात. त्यांतील विनोदहि भाषांतरित अगर मूळच्या नाटकांतील विनोदावर आधारला असल्यामुळे स्वतंत्र असा नाही. विनोदासाठी संस्कृत अगर शेक्सपिअरच्या नाटकाप्रमाणेच, एक 'मस्कऱ्या' चें पात्र खास राखून ठेवलें असावयाचें. आणि, त्याचा विनोदहि विदुषकी थाटाचा, अश्लील, बीभत्स अगर अतिशयोक्तिवर आधारलेला असावयाचा. शंकर मोरो रानडे यांच्या 'प्रेमगुटिकेंत' (१८८१) 'शेंबुड' अगर 'मेकुड' यांवर आधारलेला बीभत्स विनोद आपल्याला नाटकाच्या पहिल्याच प्रवेशांत दिसतो! तो वाचकांना शिसारी आणणारा आहे. ह्याच नाटकांत 'मुरक्या बद्दल मुकाच मागेन आणि घेईनहि' – ही चांगल्यापैकी कोटी सापडते. त्यांच्या म्युनिसिपालटीवर लिहिलेल्या 'अधिकारदान विवेचन' ह्या नाटकांतील विनोद थोडा उपहासात्मक असून बऱ्यापैकी आहे. म्युनिसिपालटी स्थापन करण्याचा कायदा पास झाला आणि त्याप्रमाणे 'अक्कलगांढा' गांवालाहि म्युनिसिपालटी स्थापन झाली. त्यामुळे गांवांतील लोकांना आपल्या आधिकारावर गदा आली, असें वाटायला लागलें. त्याचें थोडें उपहासात्मक वर्णन नाटकाच्या शेवटीं हरदास कीर्तन करीत असतांना करतात.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हरिदास (पा. ३१)...गाई म्हशी उदरीं गर्भसंभवास्तव ।
काल्किटर साहेबांकडे करा आर्जव ॥

हें एक उपहासात्मक विनोदाचें चांगल्यापैकीं उदाहरण आपल्याला त्या काळांत सापडतें.

त्यानंतर देवलांच्या ‘ शारदे ’कडे आपण पाहिलें, तर आपल्याला सुसंस्कृत विनोदाला आरंभ झाल्याचें दिसतें. त्यांनीं विनोदाचा उपयोग आपल्या कथानकाला करून घेतला आहे. ‘ कांचनभट ’ आणि ‘ सुवर्ण शास्त्री ’ यांच्या लोभामुळं आणि तोंडपुजेपणामुळें निर्माण झालेला विनोद आणि शारदेच्या मैत्रिणींनीं तिच्या भावी पतीचें केलेलें विनोदी पण मर्मभेदक वर्णन—

म्हातारा इतुका न । अवघें पाऊणशें वयमान । लग्ना अजुनि लहान ॥

चांगल्यापैकी असून सामाजिक अन्यायावर विनोदाचे कोरडे ओढण्याचा पहिला प्रयत्न ह्या नाटकांत सापडतो.

त्याचप्रमाणें, देवलांनी एकाच तजविजीच्या प्रसंगाभोवती संबंध ‘ संशय-कल्लोळ ’ नाटकाचें कथानक गुंफून नाटक संपेपर्यंत त्या एकाच प्रसंगामुळे जो घोटाळा दाखविला आहे, आणि त्यामुळे जो प्रेक्षकांना मनापासून आनंद होतो, तो घोटाळा, तो आनंद, तें हास्य, प्रसंगनिर्दिष्ट विनोदाचा उत्कृष्ट नमुना आहे. एका विशिष्ट प्रसंगाभोवती सर्व नाटकांची गुंफण करून प्रेक्षकांना हसत ठेवण्याला आरंभ देवलांनी ‘ संशयकल्लोळां ’त केला आणि त्यानंतर ताम्हणकरांनी ‘ उसना-नवऱ्यां’त व अत्रे यांनी ‘ पराच्या कावळ्यां’ त केला आहे. आणि ‘ संशय कल्लोळ ’ नाटकांतील विनोदाच्या आणि गुंफणीच्या मानाने ‘ उसना-नवरा ’ आणि ‘ पराचा-कावळा ’ सामान्य दर्जाची नाटकें वाटतात !

देवलानंतरचा काळ म्हणजे कोल्हटकर, खाडिलकर, वरेरकर व गडकरी ह्या सव्यसाची नाटककारांचा काल होय.

कोल्हटकरांचीं नाटकें रंगभूमीवर वरील इतर नाटककारांच्या मानाने गाजलीं नाहीत. पण त्यांच्या नाटकांचा, त्यांतील विनोदाचा आणि भाषेचा पुढील नाटककारांवर बराच परिणाम झालेला आहे. त्यांनीं समाजसुधारणेसाठीं विनोदाचें हत्यार उपसलें. त्यांचा विनोद बुद्धिप्रधान आहे. शाब्दिक कोट्या त्यांच्या नाटकांतून आपल्याला सापडतात. त्यांच्या नाटकांतील विनोदांत थोडा बोचकपणा असून तो खदखद हसवणारा नाही.

त्यांच्या ‘ मूकनायका ’ मधील मुक्यांची कोटी चांगल्यापैकी आहे. त्यांच्या ‘ सहचारिणी ’ नाटकांत दोन बायकांच्या दादल्याची स्थिती रेखाटली आहे. रंगरावला दोन बायकांपासून बऱ्याच मुली आणि मुलें झालेलीं असतात. त्या नाटकांतील विनोदाचा विषय दोन बायका आणि बरींच मुलें हाच प्रामुख्याने असल्यामुळें तो जरा कंटाळवाणा झाला आहे. आणि, त्यामुळे आपल्याला प्रत्येक वेळेस हसं येत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाही. त्यांच्या नाटकांतून आपल्या विनोदी विषयांची विविधता दिसत नाही, पण वैचित्र्य मात्र दिसतें. रंगरावकडे विश्वासराव आलेले असतांना—रंगराव आपल्या मुलींच्या लग्नाविषयीं बोलतो आणि सांगतो—“ काळे, हिरवे, घारे हे डोळ्यांचे सारे प्रकार आणि पांढऱ्यावाचून बाकीच्या वाटेल त्या रंगांचे केस येथे दिसून येतील. एका मुलीचे डोळे आणि दुसरीचे केस तुम्हाला आवडत असतील, तर दोघींशीं लग्न करा ! ” (अ. १ पा.२०)

खाडिलकरांच्या नाटकांत विनोदाला प्राधान्य नाही. त्यांच्या नाटकांतून आपल्याला अगदी जरूरीपुरताच आणि सहजसुलभ असा विनोद आढळतो. ‘ मानापमान ’ मधील लक्ष्मीधराचा विनोद सूक्ष्म आणि बुद्धिप्रधान असून नाट्यानुकूल असा आहे. लक्ष्मीधराचें स्वभावचित्रण अगर त्यावेळचा प्रसंग ज्याला माहीत नाहीं, त्याला तो विनोद आनंद देऊं शकत नाही. तो विनोद नाटकाच्या कथानकाचा एक भाग वाटतो. तो गडकऱ्यांच्या विनोदासारखा नाटकांतून निराळा काढून चालणार नाही.

त्याचप्रमाणें, विलासधर आणि लक्ष्मीधर यांचा ‘ चोर आल्यास तूं कसं वागायचं ’—ह्या बद्दलचा संवाद आणि विलासधराने चोराच्या नुसत्या खटक्या आविर्भावाने लक्ष्मीधराजवळ मागितलेले दागिने आणि त्यामुळे लक्ष्मीधराची उडालेली घाबरगुंडी हा प्रसंग, नाट्यानुकूल प्रसंगनिर्दिष्ट विनोदाचा चांगला नमुना आहे.

ह्यानंतर आपण गडकऱ्यांच्या नाटकांतील विनोदाकडे पाहूं. गडकऱ्यांचा विनोद अत्यंत बोचक असून पाजळलेल्या तरवारीसारखा तीक्ष्ण आहे. एकादा विशिष्ट विषय, व्यक्ति, सामाजिक अन्याय, भोंदूपणा, दुर्गुण, खोटा अहंकार, चालीरीति असा कोणताहि विषय त्यानी विनोदासाठी घेतला की तो पराकोटीला गेलाच म्हणून समजावें !

‘ एकच प्याल्यां ’ त मन्याबापू म्हणतातः—

मन्याबापूः—“ काल सारी रात्रभर तळिरामाने फक्त सनदशीर चळवळच चालूं ठेवली होती. शरीराचा स्वामी स्थानभ्रष्ट होऊं नये, म्हणून इमानी अवयवानी इतकी जबाबदारी घेतली होती की, डेक्कन सभेने सुद्धा तिच्य पुढे हात टेकावेत ! ”— यांतील उपहासामुळे आणि दोन अगदी भिन्न गोष्टींची तुलना केल्यामुळे आपल्याला हसू येतें. पण प्रसंग तळिरामच्या मृत्यूचा असल्याने हा विनोद अत्यंत बोचक आणि दुःख देणारा, अतएव, अनाठायी झाला आहे ! (एकच प्याला पा. ११)

शास्त्री:—तुम्ही जर खाण्यापिण्याचा ताल सोडूं लागलांत, तर तें आम्हा जुन्या लोकांना कधी खपायचं नाही. मांसाहार आम्हाला कधी खपायचा नाही. अरे, हुसेन, आणखी मटण आण थोडं. आगरकरांचा तिटकारा येतो, तो ह्या कारणानं ! टिळकांबद्दल आम्हाला आदर वाटतो, तो ह्या कारणानं. ” ह्या ठिकाणी शास्त्र्याच्या भोंदूपणाबद्दल आपल्याला हसूं येतें. त्याच प्रमाणें, स्वतःला फार मोठे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

समजून आगरकर-टिळकांसारख्या थोर लोकांबरोबर लायकी नसतांना स्वतःची तुलना केल्यामुळे आणि त्यांच्यावर शेरे मारल्याने आपल्याला हसूं येतें. ह्या विनोदी ' आम्ही ' चा उपयोग पुढे अत्र्यांनी फार करून घेतला आहे. उदा. ' वंदेमातरम् ' मध्ये सोमेश्वर म्हणतो, " बळवंतरावांच्या बैठकींतली आम्ही मंडळी ! " किंवा ' मी उभा आहे ' मध्ये —

ताईपोळः– मी निवडणुकीला उभी राहणार आणि स्वराज्याचा अजून पत्ता नाही.

भाईटोळः– हं, रडूं नको, मिळेल, लौकरच स्वराज्य मिळेल. जवाहरलाल, सुभाषबाबू, आम्ही, सध्या त्याच खटपटींत आहोंत.

ह्यानंतर ' प्रेमसंन्यास ' मधील गोकुळचा विनोद हा अतिशयोक्तीवर आधारलेल्या उत्कृष्ट विनोदाचा नमुना आहे. विद्याधर व गोकुळ यांचा संवाद चालू असतो.

गोकुळः– " मीहि जोराने म्हणालों की, तिने तोंड टाकलें, तर मी असें इकडलें तोंड तिकडे करून टाकीन ! असें म्हणून असा झटकाऱ्याने मागे पाहतों–

मथुराः– तों मी अशीच मागे उभी ! असेंच ना, बोला ? आता कां वाचा बसली !

गोकुळः– भीमरूपी महारुद्र वज्र हनुमान मारुती !

ह्या प्रसंगीं सर्व प्रेक्षक आणि वाचक पोट धरून हसतात. त्याला कारणें दोन आहेत. मथुरा अचानक आल्याने त्यांत एक अनपेक्षित गोड नाविन्य (Delightful novelty) आहे. गोकुळच्या तोंडांतून सहज व मथुरा आल्याबरोबर निघालेल्या मारुतीस्तोत्रामुळे त्याला मथुरेची भीति किती वाटते, हें सहज दिसतें. येथे प्रसंगनिर्दिष्ट विनोद चांगल्यापैकीं आहे. त्याचप्रमाणे, " तिच्या गालावर तोंडसुख घेण्याचा माझा अधिकारच नाही का ? " असल्या सुंदर कोट्या त्यांच्या नाटकांतून आपल्याला भरपूर दिसतात.

' भाव-बंधन ' मधील ' इंदु व बिंदू ' यांच्या कुरूपतेवर आधारलेला विनोद अत्यंत बोचक असून हीन मनोवृत्तीचा आहे. शारीरिक व्यंगावर आधारलेला विनोद हा दुर्गुणांवर आधारलेल्या विनोदासारखा उपयुक्त असा नाही. शारीरिक व्यंगें हीं विधिनिर्मित असल्याने विनोदाचे कोरडे ओढून तीं दुरुस्त होणें शक्य नाहीं. हा विनोद अनाठायी आहे. इंदू-बिंदूचा विनोद आपल्याला हसवतो, पण ते हास्य ' George Gordon ' ' शेक्सपिअरिअन कॉमेडी ' ह्या पुस्तकांत ज्याला ' unfriendly laughter ' म्हणतो तसल्या प्रकारचें आहे.

गडकऱ्यांचें नाटक न वाचतां, त्यांतील विनोद आपल्याला हसवूं शकतो. याचा अर्थ एवढाच की, त्या विनोदाचा नाटकाच्या कथानकाशीं फारसा संबंध नाही. तो नाट्यानुकूल असा बऱ्याच ठिकाणी वाटत नाही. त्यांच्या नाटकांची

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गुंफण बरीचशी सदोष आहे. आणि नाटकाची गुंफण सदोष आहे, असें म्हटल्यावर विनोदाची गुंफणहि सदोष आलीच. भाषा त्यांची बटीक होती, प्रतिभा त्यांची सावली होती आणि ह्या दोहोंच्या जोरावर त्यांनी रंगभूमी गाजवली. आणि, त्यांच्या प्रतिभेला आणि भाषेला विनोदाचा उजाळा मिळाल्यामुळे त्यांना रंगभूमीवर आपलें वर्चस्व टिकवणें कठीण गेलें नाही. त्याच काळांतील खाडिलकरांच्या 'मानापमान' मध्ये आपल्याला प्रसंगानुकूल, नाट्यानुकूल, स्वभावानुकूल विनोद सांपडतो—आणि तोहि विनोदाचा उपयोग 'सणावारीं' करणाऱ्या खाडिलकरांच्या नाटकांत ! गडकऱ्यांच्या नाटकांतून मात्र असा विनोद फारच थोड्या प्रमाणांत सांपडतो. गडकऱ्यांनी शोकरसप्रधान नाटकें लिहिलीं आणि त्यामुळे प्रेक्षकांच्या मनावर बसलेला ताण कमी करण्यासाठी त्यांनी आपल्या नाटकांतून विनोद निर्माण केला आहे. त्यांच्या विनोदांत विषयाची विविधता आहे, विनोदाचें वैचित्र्यहि आहे. शाब्दिक कोट्यांकडे आणि अतिशयोक्तीकडे त्यांचा विशेष कल आपल्याला दिसून येतो.

वरेरकरांनी बरींच नाटकें लिहिलीं. पण त्यांनी विनोदप्रधान नाटक लिहिलें नाही. आणि, म्हणण्यासारखा विनोदहि त्यांच्या नाटकांतून आपल्याला दिसत नाही. त्यांनी आपलीं नाटकें एका विशिष्ट उद्देशाने लिहिलीं आणि त्यामुळे त्यांच्या कथानकाला जरूरीपुरताच विनोद त्यांनी आपल्या नाटकांतून योजिला आहे. 'हाच मुलाचा बाप' मध्ये चांगल्यापैकीं विनोद असून 'सत्तेचे गुलाम' मध्ये प्रवेशागणिक बायको घेऊन फिरणारा मार्तंड आणि 'क्षमा-क्षमा' करीत फिरणारा कान्होबा आपल्याला हंसवतो. अं. १ प्र. ३ मधील संवाद हा नाट्यानुकूल विनोदाचा चांगला नमुना आहे.—

वैकुंठ—काय केलंत हें, दादा !

हेरंब—शंखावर शंख मारला !

वैकुंठ— .... दादा, तुम्ही मला मारलंत, आणि शंखानं मारलं, असं आता कसं सांगूं !—

यांतील शंखावर केलेला सूक्ष्म विनोद 'शंखा'ला कळण्यासारखा नाही ! अतिशयोक्तीकडे वरेरकरांचा ओढा नाही.

ह्यानंतर आपण माधवराव जोश्यांच्या नाटकांकडे पाहूं. बहुजन समाजाला आवडेल आणि कळेल, असा विनोद त्यांनी आपल्या नाटकांतून निर्माण केला आहे. बुद्धिप्राधान विनोद त्यांच्या नाटकांतून आपल्याला फारसा दिसत नाही. त्यांचा बराचसा विनोद अतिशयोक्ति, विडंबन, चमत्कृतिजन्य कल्पना, उपहास आणि शाब्दिक कोट्या यांवर आधारलेला आहे. स्मित हास्य त्यांच्या विनोदाने फारसे निर्माण होत नाही. जो विनोद हसवितो—तो पोट धरून हसायाला लावतो. सुसंस्कृत माणसाच्या समाजाविषयींच्या, स्वत: विषयींच्या आवडी-निवडींच्या, रूढ शिष्टसंमत चालीरीतींच्या, विशिष्ट कल्पना असतात. आणि त्या स्वत:विषयींच्या कल्पनेमुळे माधवरावांचा विनोद त्याला आवडत नाही. तो अप्रस्तुत व शिष्ट बंधनांचें उल्लंघन करणारा आहे, असें त्याला वाटते. तो विशेष बुद्धिप्रधान नसल्याने तो आपल्यासाठी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नसून खालच्या वर्गासाठी आहे, ही जाणीव त्याला मूलत:च असते. आणि, त्यामुळे तो सर्वच ठिकाणीं हंसत नाही. उलट, सर्वसाधारण प्रेक्षक सारखा हंसत असतो. याबद्दल नाटककारालाहि दोष देण्यांत अर्थ नाही आणि प्रेक्षकालाहि दोष देण्यांत अर्थ नाही.

माधवरावांची विनोदी प्रकृती असतांना सुद्धा त्यांनी विनोदाचे बहुरंगी विविध प्रकार हाताळले नाहीत. नाट्यानुकूल विनोद 'म्युनिसिपालटी' शिवाय त्यांच्या नाटकांतून कुठेच फारसा दिसत नाही. 'संशयकल्लोळ' सारखे एकाद्या विशेष प्रसंगाभोंवतीं साऱ्या नाटकाची उभारणी करून प्रेक्षकांस सतत हंसत ठेवण्याचें काम त्यांनी केलें नाही. पण पहिलें विनोदी नाटक लिहिण्याचा पहिला मान माधवरावांचा आहे. असला अपुरा प्रयत्न गडकऱ्यांनीं 'वेड्याच्या बाजारांत' केला होता. 'संगीतविनोद,' 'आनंद' हीं माधवरावांचीं नाटकें संपूर्ण विनोदी असून 'वऱ्हाडचा पाटील,' 'म्युनिसिपालटी' 'विश्ववैचित्र्य,' 'पैसाच पैसा' ह्या नाटकांतून भरपूर विनोद आहे.

सामाजिक दुर्गुणावर, भोंदूपणावर व अन्यायावर माधवरावांनी विनोदाचे कोरडे ओढले आहेत. 'म्युनिसिपालटी' नाटक हें त्याचें उत्तम उदाहरण आहे. विनोदासाठी विनोद निर्माण करून त्यांनी आपलीं नाटकें लिहिलीं त्यामुळे नाटकांत विशेष असें कथानक नाही. समाजांतील दुर्गुण, भोंदूपणा, मूर्खपणा, अन्याय, स्वत: विषयींच्या खोट्या कल्पना, विचित्रता हाच त्यांच्या विनोदी नाटकांचा विषय आणि कथानक. त्यामुळे कथानकाला गती देणारे अगर उपयुक्त अशा विनोदाचे उतारे त्यांच्या 'म्युनिसिपालटी' शिवाय अन्यत्र सांपडत नाहीत. ह्या नाटकांतील पात्रें बहुजनसमाजाचे प्रतिनिधिरूप आहेत, पांढरपेशा समाजाचे नाहीत; त्यामुळे विनोदहि बहुजनसमाजाला आवडेल असाच आहे. अंबू अगर गंगूपासून उत्कृष्ट बुद्धिप्रधान विनोदाची अपेक्षा करणें मूर्खपणाचेंच ठरणार नाही का ?

'म्युनिसिपालटी' नाटकांत उपहासात्मक आणि विडंबनात्मक विनोद भरपूर आहे. धेनुवल्लभ 'अपाइंटमेंट' ला 'आईंटमेंट' म्हणतो, किंवा 'कॉन्स्टिट्यूशन' ला 'कॉन्स्टिपेशन' म्हणतो, हें योग्यच आहे. असले धेनुवल्लभ प्रत्येक म्युनिसिपालटी-मधून अजूनहि दिसतात. ह्या नाटकांतील विनोद पात्रांच्या मूर्खपणामुळे, अज्ञानामुळे आणि गैरसमजुतीने निर्माण झाला आहे.

संगीत आनंद:—

डॉ. होमोपाथ:— "मला तुमच्या सर्जरीची ऐट मारूं नका. परवा एका कुत्र्याच्या शेपटीवरून गाडीचें चाक गेल्यामुळे शेपूट तुटलें. मी ताबडतोब होमोपाथिक गोळ्या कुत्र्यास घातल्या ! ताबडतोब कुत्र्याचें शेपूट वाढलें !

डॉक्टर:—दिमाख दाखवितो आहे होमोपाथीचा ! रस्त्यावर पडलेल्या शेपटीचा तुकडा मीं दवाखान्यांत आणून ऑपरेशन करितांच शेपटीच्या तुकड्यास कुत्रें फुटलें !"

—हें एक अतिशयोक्तीचें उत्तम उदाहरण आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सं: विनोद:—

बामनराव:—इंदिरे, तूं जर जहाल असलीस, तर आजपासून मिरे, मोहऱ्या, हिंग, लवंग ह्यांवाचून अन्नकणहि तोंडांत घालणार नाही! माझा रसरशीत जहालपणा सिद्ध करण्याकरिता ह्या ठिकाणीं तुझ्यासमोर अर्धा शेर सुंठ चावून टाकतों!' ह्या ठिकाणीं 'जहाल' वरील श्लेष चांगल्यापैकी आहे.

त्यांच्या 'पैसाच पैसा' नाटकांत कनीश्वर वेष बदलून कानडी वेषांत प्रेक्षकांसमोर येतो व त्यामुळे हसूं येतें. पण हा विनोद मूळ गडकऱ्यांचा असल्याने त्यांत नाविन्य नाही. त्याचप्रमाणें, एका पायांत बूट, दुसऱ्या पायांत जोडा······ह्यामुळे निर्माण झालेला विनोदहि विदुषकी थाटाचा असून हीन दर्जाचा आहे. त्याचप्रमाणे परभाषेची टिंगल करून विनोद निर्माण करणें हाहि चांगल्यापैकी विनोद नाही. तो विनोदाचें मर्म घालविण्यास कारणीभूत होतो. अश्लील, ग्राम्य व वरील प्रकारचे विनोदी उतारेहि माधवरावांच्या नाटकांतून भरपूर सापडतात. त्यांच्या विनोदांत कांही ठिकाणी कृत्रिमता आढळते.

ह्या नंतर शं. प. जोशी ह्यांच्या नाटकांतून बऱ्यापैकीं विनोद सांपडतो. पण त्यांच्या विनोदांत विषयांची विविधता नाही. तो बऱ्याच ठिकाणीं ओढून–ताणून आणल्यासारखा वाटतो. तो सहज सुलभअसा वाटत नाही. त्यांच्या 'विचित्र–लीला' ह्या नाटकांत शब्दानुप्रासामुळे व वाक्यांतील सारख्या शब्दयोजनेमुळे केलेल्या वर्णनाने हास्य निर्माण झालें आहे. चमत्कृतिजन्य असा विनोदहि त्यांच्या नाटकातून आपल्याला दिसतो. त्यांच्या 'खडाष्टक' नाटकांतील विनोद बऱ्यापैकीं आहे. ह्या नाटकांत कर्कशराव व वक्रतुंड यांचें स्वभावचित्रण विनोदी असून तें त्या त्या पात्रांच्या विशिष्ट सवयींभोवती, वेडाभोवती गुंफलेलें आहे. वक्रतुंड हा संकृतप्रचुर व त्याचें अर्थी पण अप्रस्तुत अशा शब्दयोजना नेहमी करीत असतो. आणि त्या त्याच्या वेडाभोवतीच त्याचें विनोदी स्वभावचित्रण केलें आहे.त्याचप्रमाणें कर्कशरावाचें स्वभावचित्रण आहे. ह्या नाटकांतून आपल्याला स्वभावनिष्ठ विनोदी पात्रें पहिल्यांदा दिसतात. पण तो विनोद पात्रांच्या मनोविश्लेषणावर आधारलेला नसल्यानें पुढे कंटाळवाणा वाटतो.

वक्रतुंड:—पण आधी तुझं अन्न पचन झालं का गणेश ! तुझ्या स्वयंपाकाचा अंत झाला असला, तर देवरचनेपूर्वी थोडा चहा कर्तव्य आहे. बहूनि कपानि नको, पूर्ण पंचपात्र पुरे. स्वभावानुकूल विनोदाचे वक्रतुंड आणि कर्कशराव हे दोन नमुने आहेत. पण ह्यापेक्षा सुंदर–सहजसुलभ विनोदी स्वभावचित्रण आपल्याला अन्यांच्या नाटकांतून दिसतात.

• • •

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय

लेखनाची ता. १०-३-१९४८

संघाध्यक्ष प्रा. कोलते

विदर्भ-साहित्य-संघाच्या अध्यक्ष-पदीं प्रसिद्ध तरुण साहित्यिक प्रा. वि. भि. कोलते यांची निवड झाली, तिजबद्दल मी त्यांचें 'युगवाणी' तर्फे व स्वत:तर्फे मन:पूर्वक अभिनंदन करतों. प्रा. कोलते यांनी महानुभाव-वाङ्मयाचे संशोधक म्हणून महाराष्ट्रभर लौकिक मिळविला आहे. अशा साक्षेपी विद्वानाला हा मान मिळाला, ही गोष्ट अत्यंत उचित अशीच झाली. प्रा. कोलते यांच्या नेतृत्वाखाली संघाचें कार्य उत्साहाने चालेल, याविषयीं मला शंका नाही.

गोंदिया येथील अधिवेशन स्थगित झालें, यामुळें मात्र सर्वांचाच विरस झाला आहे. पण परिस्थितीपुढे कोण काय करणार ?

'मुद्राराक्षसा' चा प्रताप !

'युगवाणी' च्या जाने. च्या अंकांत रा. सरपटवार यांची 'विशाल जीवन' नांवाची कविता प्रसिद्ध झाली होती, ती फेब्रु. च्या अंकांत पुनर्मुद्रित झाली आहे! 'मुद्राराक्षसा' च्या या अपूर्व करामतीची तारीफ करावी, तितकी थोडीच आहे! माझ्याकडे स्थूल मुद्रितें पाठविणें छापखान्याला सोईचें होत नसल्यामुळे 'मुद्राराक्षसा' ला डोकें वर काढण्यास वारंवार संधि मिळत आहे, याची मला जाणीव आहे! तथापि 'क्षमस्व' म्हणण्यापलीकडे मी तरी अधिक काय करूं शकतों ?

'स्वतंत्र हिंदुस्थान' व 'समाधान'

विदर्भाचे पुढारी वीर वामनराव जोशी यांचें 'स्वतंत्र हिंदुस्थान' साप्ताहिक पुन्हा सुरू झाले आहे, याचा सर्व स्वातंत्र्यभक्तांस आनंद होईल. विदर्भाच्या राजकारणांत शिरलेल्या जातीयतेसारख्या अनिष्ट प्रवृत्तींना आळा घालण्याचें कार्य 'स्वतंत्र हिंदुस्थान' जोराने करील, याची कोणीहि ग्वाही देईल.

त्याचप्रमाणे, प्रा. श्री. ना. बनहट्टी यांनी नागपुरास 'समाधान' नांवाचें उच्च दर्ज्याचें साप्ताहिक सुरू केलें आहे, याबद्दल त्यांचेंहि अभिनंदन करणें अवश्य आहे. हें पत्र आपल्या नांवाप्रमाणेंच वाचकांस 'समाधान' प्राप्त करून देईल, अशी उमेद आहे.

पुस्तकांवरील अभिप्राय

'युगवाणी'कडे आलेल्या कांही पुस्तकांवर अजून अभिप्राय यावयाचे आहेत. स्थलावकाशाप्रमाणें त्यांवर अभिप्राय देण्यांत येतील. तरी भेटीदाखल पुस्तकें धाडणाऱ्यांनी या विलंबाबद्दल क्षमा करावी.

* * *

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

प्रा. नारायण कृष्ण दिवाणजी
सरचिटणीस वि. सा. संघ
यांजकडून

विदर्भ साहित्य संघाच्या निवडणुकींचा निकाल

ता. २२-२-४८ व ता. २५-२-४८ रोजीं मतमोजणी होऊन विदर्भ साहित्य संघाच्या, १९४८ सालासाठीं म्हणून जाहीर झालेल्या, निवडणुकींचे निकाल खालील प्रमाणे लागले.

अध्यक्षीय निवडणूक

विदर्भ साहित्य संघाचे १९४८ सालाकरिता अध्यक्ष म्हणून प्रा. वि. भि. कोलते, नागपूर यांची निवड झाली आहे.

कार्यकारी मंडळावर खालील १४ सभासदांची निवड झाली आहे.

१. प्रा. श्री. ना बनहट्टी, नागपूर	२. प्रा. ना. कृ. दिवाणजी, अमरावती
३ रा. पु. य देशपांडे, नागपूर	४. रा. मा. ल. व्यवहारे, अमरावती
५. रा प्र. ना. खोडे, अकोला	६. डॉ. मा. गो. देशमुख, अमरावती
७ रा. अ वि. माटोडकर, नान्दुरा	८ रा के. दे. देशपांडे, अमरावती
९. प्रा. स. रा. सोमलवार, नागपूर	१०. रा. धैर्यशील वाघ, अमरावती
११ रा. वा ना. देशपांडे, यवतमाळ	१२. रा. शं. ना. सहस्रबुद्धे, अमरावती
१३ प्रा. वा. कृ. चोरघडे, वर्धा	१४. रा. वी. अ लिमये, गोंदिया

या नंतर घटनेप्रमाणे अध्यक्ष प्रा. वि. भि. कोलते यांनी आपल्या अधिकारांत

१. डॉ. य. खु. देशपांडे, यवतमाळ
२. रा. रा. पु. सगदेव, नागपूर

या दोन सभासदांना कार्यकारी मंडळावर नियुक्त केलें आहे. वरील सर्व सभासदांनी वरील निकालाबाबत आपली संमति कळविली आहे.

अध्यक्षांखेरीज इतर पदाधिकाऱ्यांची निवडणूक

नंतर ता. ७-३-४८ च्या कार्यकारी मंडळाच्या सभेंत अध्यक्षांखेरीज इतर पदाधिकाऱ्यांची निवडणूक खालीलप्रमाणे झाली.

१. उपाध्यक्ष —डॉ. मा. गो. देशमुख, अमरावती
२. सरचिटणीस—प्रा ना. कृ. दिवाणजी, अमरावती
३. चिटणीस —रा. रा. पु. सगदेव, नागपूर
रा. अ. वि. माटोडकर, नान्दुरा
४. खजीनदार—रा. मा. ल व्यवहारे, अमरावती

नवीन अध्यक्षास अधिकार-प्रदान

विदर्भ साहित्य संघाचे १९४७ चे अध्यक्ष रा. पु. य. देशपांडे यांच्या अनुपस्थितीमुळे उपाध्यक्ष डॉ. मा. गो. देशमुख यांनी प्रसंगोचित भाषण करून ता. ७-३-४८ च्या वार्षिक साधारण सभेंत (अमरावती) नवीन संघाध्यक्ष प्रा. वि. भि. कोलते याना अधिकारप्रदान केलें. स्वीकारादाखल त्यानंतर प्रा. वि. भि. कोलते यांनीहि महत्त्वपूर्ण व प्रसंगोचित भाषण करून, आपल्या-समोरील कार्याची रूपरेषा सभेपुढे समजावून सांगितली. त्यानंतर विदर्भ साहित्य संघाचे सरचिटणीस प्रा. ना. कृ. दिवाणजी यांनी जुन्या कार्यकारी मंडळांतील सर्व सभासदांचे त्यांच्या हार्दिक सहकार्याबद्दल आभार मानले आणि नवीन कार्यकारी मंडळांतील सभासदांचे त्यांच्या निवडणुकी-बद्दल अभिनंदन केलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रांत वऱ्हाड शाळाखात्याने आपल्या ता. ११-१-४७ च्या ऑर्डर नं. 104|Genl | A अन्वयें ‘युगवाणी’ मासिकास लायब्ररीसाठी मंजूरी दिली आहे.

‘रीटा’मुळे आकर्षक केस–उगवतात

केससमृद्धिसाठी ‘रीटा’ हें एक नवीन साधन आहे. केसाच्या मुळांतील नैसर्गिक स्रवणास त्याने पोषण होते. खवड्यास व टक्कलास अटकाव होऊन अनुपम सौंदर्याचे लांब सुंदर केस उगवतात. त्याने खराब केसांना सुंदर चकाकी मिळते आणि वाकड्या केसासाठीं तें उत्तम आहे. ‘रीटा’ची एक बाटली घेऊन तुमच्या केसांना अनुपम सौंदर्य द्या.

एका बाटलीची किं. १५आणे.

× प्रत्येक ठिकाणीं मिळते. ×

RITA
HAIR TONIC

उत्तर हिंदुस्थानी सिनेतारका तुम्हांला काय सांगतात ?

ललिता पवारः–ज्यांना उत्तमपैकीं केशवर्धक हवें असेल, त्यांना मीं “रीटा” वापरून पहाण्याची शिफारस करतें. आणि, मला खात्री आहे कीं, यावरून आपली मातृभूमि किती उत्तमोत्तम वस्तू तयार करूं शकतें हें त्यांना कळून येईल.

शारदा जुन्नरकरः–मी माझ्या केसासाठीं “रीटा” वापरण्यास सुरवात केली त्यायोगें माझे केस जाण्याचें जादूप्रमाणें थांबलें. ‘रिट्यां’त केस नरम करणारी व त्यांना रेशमाप्रमाणें तकाकी आणणारी अनेक द्रव्यें असून मीं खात्रीपूर्वक म्हणूं शकतें कीं, “रीटा” हें एक अद्भुत केशवर्धक आहे.

के. ईश्वरलालः–मी एकदां “रीटा” वापरलें व त्यानंतर माझ्या कुटुंबातील सर्वच मंडळींना “रीटा” वापरण्याची संवयच लागली. माझ्या मित्रांना केशवर्धकांमध्यें “रीटा” हेंच पसंत पडेल ही खात्री आहे.

व्हेटो कंपनी, जोन्स स्ट्रीट, मद्रास

द. ना. ठाकूर यांनी ठाकूर आणि कंपनी लि. च्या महेश्वर मुद्रणालयांत छापून ‘युगवाणी’ कार्यालय १९। ४२५ मुधोळकर पेठ अमरावती, येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ